म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा वा
दा. क्र. : १५७०४

IRBK-0115704

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
क्र.

# हर हर महादेव

डॉ. लु. ता. सावंत



म. ग्रं. सं. ठाणे,
प्र. क्र. 95608 दि. 95/9/65


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

16 FEB 1975
21 FEB 1975
7 MAY 1975
6 SEP 1975
23 JAN 1976
14 MAR 1976

[क्रृ. मा. प.]

# हर हर महादेव

डॉ. हु. ता. सावंत



IRBK-0115704

प्रकाशक :
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य
१२५७ सदाशिव पेठ, पुणे ३०

◻ ◻ ◻

© डॉ. तु. ता. सावंत

गणेशचतुर्थी १९७४

◻ ◻ ◻

मुद्रक :
म. बा. जोशी
ज्ञानविलास छापखाना
२७ बुधवार पेठ, पुणे ३०

इंद्रायणी साहित्य
पुणे

५५७८४

कौ. वा.

# १. शुरू हुवा है जंग हमारा

गडावर संध्याकाळ उतरत होती.

" ह ..  आकाशाच्या घुमटाखाली तो प्रचंड गड विसावला होता. गडाच्या तटालगत राजे उभे होते. एकटेच उभे होते. गडाखालून गडावर चढणारी जे निरखीत होते. ते कोणाची तरी वाट पाहात होते. आकाशातून निळाई झरझरत होती; डोंगरांची रांग अधिक र दिसत होती. गडाखालील धरती तिन्हीसांजांच्या रंगांत होती.

राजे बराच वेळ एकाच जागी उभे होते. त्यांना एकलेपणा ला. त्यांच्या मनात विचार आले– मी पूर्वी एकटा होतो. आज आहे. पुढेही एकटाच राहणार. कारण लोकांना गुलामीची लागली आहे. त्यांचा स्वाभिमान संपला आहे. त्यांचे तेज ४ आहे. भाकरीच्या तुकड्यासाठी ते नादान झाले आहेत. । वतन हवे आहे. मनसब हवी आहे. जहागीर हवी आहे. लोक एकमेकांचे गळे कापीत आहेत. आपसांत लढत आहेत. ं बनले आहेत. छे! छे! हे आता संपायला हवे. त्यासाठी ी गुलामीतून मुक्त करायला हवी. जे येतील त्यांना बरोबर येतील त्यांना बाजूला ठेवून मायभूमी स्वतंत्र करायला

राजांना पराक्रमी राजघराणी आठवली– राष्ट्रकूट-चालुक्य- ार, शालिवाहन. कदंब-वाकाटक. यादव. विजयनगरने

यवनांशी केलेली अटीतटीची झुंज राजांच्या डोळ्यापुढून सरकली. पाच पांडवांनी कुरुक्षेत्रावर घडविलेला इतिहास त्यांना आठवला आणि त्यांना आठवले– श्रीराम आणि श्रीकृष्ण या एकेकटच्या वीराने केवढे राजकारण केले ! केवढा पराक्रम केला ! आपले एकेक युग निर्माण केले ! श्रीरामाबरोबर वानर होते. श्री... यादव होते आणि माझ्याबरोबर कोण आहे... म। जीव देणारे. माझा शब्द झेलणारे. मायभूमीसाठी मर...

आणि राजांच्या मनासमोर तुळजापूरची भवानीदेवी उभी राहिली. त्यांना शिखर-शिंगणापूरचा शंभू महादेव आठवला. त्यांच्या अंगात एक अद्‌भुत शक्ती संचारली. राजे मनाशी उद्‌गारले, ' मी एकटा नाही. परमेश्वर माझ्या पाठीशी आहे. हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा आहे ! '

इतक्यात गडाच्या वाटेने येणारी एक व्यक्ती राज दिसली. ती व्यक्ती सरळ राजांकडे आली. राजांनी ओळख तोच तो. राजांचा हेर होता तो. विजापूरची खबर घेऊन आला होता.

त्याने राजांना मुजरा केला.

"काय खबर ?" राजांनी विचारले.

"खबर चांगली नाही."

"बोल ! "

"विजापूरच्या बादशहाने शहाजीराजांना कैदेत आहे. आणखी...."

"आणखी काय ?" राजांनी विचारले.

"फत्तेखान स्वराज्यावर चालून येत आहे.

" कोण कोण आहेत फत्तेखानाबरोबर ?"

" मुसेखान, रतनशेख, मिनादशेख, शरीफशहा आणि......"

" आणि मराठे सरदार कोण कोण आहेत ? "

" बाळाजी हैबतराव, मताजी घाटगे, आणि.... आणि ...."

" अडखळतोस का ? आणखी कोण ? "

" बजाजीराजे निंबाळकर !"

बजाजी निंबाळकर म्हणजे शिवाजी राजांचे मेहुणे. सईबाइचे सख्खे भाऊ. नात्याची माणसेही शत्रूला सामील होती. त्यांच्याशी लढावे लागणार होते. नाइलाजाने. स्वराज्यासाठी. मायभूमीला मुक्त करण्यासाठी !

" फत्तेखानाबरोबर किती फौज आहे ?"

" पाच हजार असावी !"

" ठीक. जा. उद्या सकाळीच भेट."

तो गेला. राजे राजवाड्याकडे निघाले. ते राजवाड्यात शिरले आणि पाठोपाठ दुसरी खबर आली. त्यांच्या दुसऱ्या नजरबाजाने खबर आणली होती. खबर वाईटच होती. फत्तेखानाच्या हुकमाने बाळाजी हैबतरावाने शिरवळचा किल्ला मराठ्यांकडून जिंकून घेतला होता. स्वतः फत्तेखान राजांवर चालून येत होता. चिमुकल्या स्वराज्यावर भयंकर संकट आले होते !

त्या वेळी राजे शिवाजी अठरा वर्षांचे होते.

राजांनी अशी रात्र कधी अनुभवली नव्हती. भयंकर प्रसंग होता. भयंकर संकट होते. भयंकर पेच होता. यापूर्वी तोरणा त्यांनी घेतला होता. राजगड सहज बळकावला होता. कोंडाणा न लढताच घेतला होता. शिरवळचा किल्लाही सहजासहजी घेतला होता. शत्रूशी समोरासमोर लढाई झाली नव्हती. पण आता ?



ठरल्या. पहिल्याने शिरवळचा किल्ला घ्यावा. मग फत्तेखानाचा डाव उधळावा, असा बेत ठरला.

शिरवळ पुरंदरापासून सात कोसांवर होते. विजापूर व अहमदनगर येथील दोन्ही बादशहांना ते जवळ होते. त्यामुळे तेथे वारंवार लढाया होत. शिरवळला विजापूरच्या अमीनाचे ठाणे होते. तेथे मोठी पेठ होती. शिरवळला भुईकोट होता. त्याचे तट मातीचे होते, पण ते फार उंच नव्हते. तटाभोवती पाण्याचा खंदक होता, पण तो फार खोल नव्हता.

शत्रूशी ही पहिलीच लढाई होती. राजांच्या सौंगड्यांना अवसान चढले होते. सगळेच लढाईवर जायला उतावीळ झाले. राजांनी कावजी मल्हार याला सेनापती नेमले. त्याच्याबरोबर हजार-बाराशे मावळे दिले.

पुरंदरवर नौबत झडली.

मावळ्यांनी राजांना मुजरे केले.

राजांनी सुयश चिंतिले.

कावजी मल्हार आणि मावळे दौडत निघाले. सुसाट दौडत निघाले त्यांनी शिरवळचा किल्ला गाठला. मावळ्यांनी किल्ल्यावर जोराचा हल्ला केला. बाणांचा पाऊस पाडला. त्यांनी हजार मुखांनी गर्जना केली. 'हर हर महादेव !'

मावळ्यांच्या रणगर्जनेने भुईकोट दणाणला.

मावळ्यांनी खंदक पार केला. ते तटाला भिडले. बाळाजी हैबतरावांचे दोन हजार सैनिक लढायला तयार झाले.

बाळाजी हैबतरावाने मावळ्यांवर अनेक शस्त्रांचा मारा केला. त्यांच्या फौजेने मराठ्यांवर दगडांचा मारा केला. पेटते पलिते भिरकावले. जळते काकडे सोडले. लाल भडक निखारे टाकले. तापलेले तेल ओतले.

मावळ्यांनी कशालाही जुमानले नाही. ते तटाला भिडले. शिड्या लावून तटावर चढले. त्यांनी पटापट आत उड्या टाकल्या. मावळ्यांचा आवेश त्यांच्या मनात मावत नव्हता. त्यांनी आकाशभेदी रणगर्जना केली– हर हर महादेव ! हरहर महादेव ! हरहर महादेव ! !

भयंकर मारामारी झाली.

मावळ्यांनी पराक्रमाची शर्थ केली.

पुन्हा रणगर्जना करून ते शत्रूवर तुटून पडले. 'हाणा, कापा, मारा !' असा एकच गदारोळ झाला.

कावजी मल्हार आवेशाने पेटला होता. तो शत्रूला सपासप कापीत सुटला होता. त्याच्यापुढे कोणीही टिकत नव्हता. त्याची

तलवार शत्रूच्या रक्ताने निथळत होती.

काvजी मल्हार बाळाजी हैबतरावाला धुंडीत होता. तो त्याला दिसला मात्र. त्याने वाघासारखी त्याच्यावर झेप घेतली. दोघांची हातघाईची लढाई सुरू झाली. दोघेंही गडी भारी! दातओठ खाऊन ते लढू लागले. घामाने भिजू लागले. रक्तानें निथळू लागले.

एकाएकी कावजी मल्हारने उडी मारली. हूल दिली. आणि डोळ्याचे पाते लवते न लवते तोच आपली तलवार बाळाजी हैबतरावाच्या छाताडात सपकन खुपसली !

बाळाजी हैबतराव ठार झाला !<br>
विजापूरचा पराभव झाला.<br>
मावळ्यांनी पहिली लढाई जिंकली.<br>
मावळ्यांनी जयघोष केला—<br>
शिवाजी महाराजांचा विजय असो !<br>
शिवाजी महाराजांचा विजय असो !!<br>
शिवाजी महाराजांचा विजय असो !!!



# २. फत्तेखानाचा पराभव

शतकाशतकानंतर पुरंदरावर एक अपूर्व सकाळ उगवली. ताजी. टवटवीत. प्रसन्न. सुंदर. सुमंगल ! ती सकाळ सणासारखा उत्साह घेऊन आली. त्या दिवशी सूर्यनारायण सोन्याच्या पावलांनी उगवला. डोंगरांच्या रांगांरांगांवर सोने शिंपीत तो वर आला. गर्द जंगले सोन्याने माखली. झाडे लखलखली. धरती चकचकली.

मावळ्यांनी शिरवळ सर केल्यानंतरची ती पहिली सकाळ होती. पहिल्या विजयानंतरची ती पहिली सकाळ होती मावळ्यांनी शिरवळावर विजयाची मेढ रोवली होती. एक हजार मावळ्यांनी दोन हजार शत्रूंचा चुराडा केला होता. बाळाजी हैबतरावासारखा स्वराज्याचा शत्रू नष्ट केला होता. मावळ्यांचा उत्साह त्यांच्या मनात मावत नव्हता. त्यांची मुठीएवढी हृदये आकाशाएवढी झाली होती. त्यांचा स्वाभिमान धगधगला होता. आत्मविश्वास बळावला होता.

पुरंदरावर चैतन्य खळखळत होते.

शिवाजी महाराज उच्चासनावर विराजमान झाले होते. त्यांच्या मंदिलावरील रत्ने झळकत होती. मोत्यांचा घोस डोलत होता. कानांतील चौकडे डुलत होते. त्यांच्या गौरवर्णाला अपूर्व तेज आले होते. चेहऱ्यावरून स्मित ओसंडत होते. डोळ्यांत तेज मावत नव्हते. महाराजांचे राजबिंडे रूप अपूर्व देखणे दिसत होते !

कावजी मल्हार महाराजांना लवून लवून मुजरा करीत होता. त्याचे हृदय आनंदाने उचंबळत होते. त्याचा उत्साह त्याच्या देहात मावत नव्हता. चैतन्याची गंगा त्याच्या नसानसांत खळाळत होती. आदल्या रात्री त्याने मोठे देशकार्य केले होते. स्वराज्याची पहिली लढाई जिंकली होती. स्वराज्याच्या शत्रूला पहिल्यांदा चीत केले होते. विजयाचा पहिला मानकरी ठरला होता कावजी मल्हार !

महाराज मोठ्या कौतुकाने कावजीला न्याहाळीत होते.

त्याच वेळी महाराजांच्या समोर शस्त्रांचे ढीग रचले जात होते. काय होते त्यांत ? ढाली, तलवारी, तीरकमठे, भाले, बरच्या, आणखी अनेक शस्त्रे. शिरवळच्या किल्ल्यातली शत्रूची ही शस्त्रे. कोवळ्या स्वराज्याच्या छाताडात खुपसायला आणलेली ही शस्त्रे. मराठ्यांना मारायला आणलेली बाळाजी हैबतरावाच्या, मराठ्यांच्या हातातली ही शस्त्रे. ह्या शस्त्रांवर मावळ्यांनी मात केली होती. शत्रूला मारून त्यांनी ती हस्तगत केली होती. कशासाठी ? शत्रूची शस्त्रे शत्रूवर उलटविण्यासाठी, ठोशास ठोसा देण्यासाठी. तुर्कीचा जबाब तुर्कीत देण्यासाठी !

शस्त्रांचे ढीग कोवळ्या उन्हात चकाकले. महाराजांचे डोळे लखलखले. महाराज खूष झाले. आनंदले. मावळ्यांच्या पराक्रमाने तृप्त झाले. शस्त्रे म्हणजे महाराजांची धनदौलत होती. स्वराज्यासाठी शस्त्रे हवी होती. घोडे हवे होते आणि संपत्ती हवी होती. परक्या देशातून आलेल्या परक्या शत्रूंना लुटून हे सगळे मिळवायला हवे ! शत्रूला सामील झालेल्या स्वकीयांनाही लुटून हे सगळे मिळवायला हवे. महाराजांनी निर्धार केला. स्वराज्याच्या आड येणारा कोणीही असो. त्याला लुटायचे, मारायचे, नष्ट करायचे.

स्वराज्य वाढवायचे, गडकोट बांधायचे आणि हिंदवी स्वराज्य स्थापायचे !

महाराज उठले. बाहेर निघाले. त्यांच्यामागून बाजी पासलकर, येसाजी कंक, कावजी मल्हार, भिमाजी वाघ, भिकाजी चोर आणि भैरोजी चोर हे चालू लागले.

गडाबाहेर हजार मावळे महाराजांच्या दर्शनाची वाट पहात उभे होते. त्यांनी महाराजांना पाहिले. महाराज्यांच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडत होता. हास्य झळाळत होते. त्यांच्या डोळ्यांत मावळ्यांचे कौतुक साठले होते. महाराजांची देखणी मूर्ती पाहून मावळी फौजेत उत्साहाची लाट उसळली. शिवरायांच्या जागी मावळ्यांना काय दिसले ? चारित्र्यवान श्रीराम हरहुन्नरी श्रीकृष्ण. दयाळू शिवशंकर ! आपल्या वीरनायकाला पाहून मावळे आनंदले, उचंबळले. हजार मुखांतून जयघोष झाला–

महाराजांचा विजय असो !

पुरंदरच्या पर्वतराजी जयघोषाने निनादल्या. हजार मावळे मुजऱ्यासाठी वाकले. हजार मुजरे पुन:पुन: झडले. महाराजांनी आपले दोन्ही हात उभारले. मावळ्यांचे अभिनंदन केले. मावळ्यांच्या अंगावर मणमण मास चढले. पुन्हा जयघोष झाला–

महाराजांचा विजय असो !

ते दृश्य अपूर्व होते. रोमांचकारी होते. विलक्षण होते !

दुपारी महाराजांना खबर मिळाली. फत्तेखान पुरंदरापासून पाच कोसांवर येऊन ठेपला होता. बेलसर गावात त्याने भली मोठी छावणी थाटली होती. बेलसरच्या त्या सपाट मैदानावर तंबू-राहुट्यांची गर्दी झाली होती. राहुट्याराहुट्यांत शिपाई चैन करीत होते. तंबूतंबूत सरदार आरामात लोळत होते आणि फत्तेखान

आपल्या शामियान्यात हुक्क्याची नळी तोंडात धरून धूर सोडीत मजेत बसला होता.

फत्तेखान आणि इतर खान कोठले ? परदेशातले. त्यांची चैनबाजी कशावर चालली होती ? या देशाच्या संपत्तीवर. आणि त्यांचे काम काय ? बादशहाचा हुकूम झाला की या देशातील लोकांना ठार मारणे,– बस्स !

फत्तेखानासारखे परके लोकच स्वराज्याचे शत्रू होते ? छे,छे ! महाराष्ट्रातील खानदानी लोकही त्यांच्याबरोबर होते. सगळ्या जातीतले. सगळ्या थरांतले. सगळ्या मुलखातले. त्यात सरदार होते, शिपाई होते, राजे होते, जहागिरदार होते, देशमुख होते, देशपांडे होते, पाटील होते, कुलकर्णी होते. कोण नव्हते ?

फत्तेखानाबरोबर केदारजी खोपडे आला होता. हा उत्रवलीचा देशमुख. बजाजी निंबाळकर आला होता. हा महाराजांचा मेहुणा. मताजी घाटगे आला होता. हा खानदानी मराठा सरदार आणि शिपाई हजारो आले होते. ही या महाराष्ट्राची लेकरे. पण मायभूमीची त्यांना ओळख नव्हती. महाराष्ट्राची कथा ते विसरले होते. रयतेच्या व्यथेची त्यांना पर्वा नव्हती. त्यांना चिंता होती पोटाची. पोटासाठी ते परक्या बादशहाची पोपटपंची करीत होते. वतनासाठी बादशहापुढे वाकत होते. जहागिरीसाठी झुकत होते. मनसबदारीसाठी रणांगणावर मरत होते. त्यांचा स्वाभिमान, धर्माभिमान आणि देशाभिमान लोपला होता, संपला होता, खपला होता !

अशा परिस्थितीत शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापण्याची शपथ घेतली होती !

महाराजांनी आपल्या सौंगड्यांना बोलाविले. पुरंदरावर खलबते झाली. मनसुबा ठरला. निर्धार झाला. फत्तेखानाबरोबर पाच हजार फौज असो, नाही तर पाच लाख असो! त्याच्या बेलसरच्या छावणीवर छापा घालायचा. त्याचा तळ तुडवायचा. त्याच्या फौजेचा फडशा पाडायचा.

बेत पक्का झाला, तयारी सुरू झाली.

पुरंदरावर अद्‌भुत रात्र उतरली.

एक हजार घोडेस्वार सुसज्ज झाले. आयुष्य तळहाती घेऊन लढायला तयार झाले. राजांसाठी मरावे, राजांसाठी उरावे, राजांसाठी वाटेल ते दिव्य करावे या भावनेने प्रत्येक मावळा भारावला होता.

ती एक स्वप्नांनी भारावलेली रात्र होती. पुरंदर भारावला होता. सभोवतालची गर्द झाडी भारावली होती. आकाशातील तारे भारावले होते.

कारण त्या मध्यरात्रीला देशातील कोटी कोटी लोक गाढ झोपेत घोरत पडले होते आणि अठरा वर्षांचा एक चिमुकला मुलगा प्रचंड शत्रूशी लढून स्वराज्य स्थापण्याच्या निर्धाराने पुरंदरावर उभा होता आणि त्याचे केवळ एक हजार मावळे त्याच्या इच्छेसाठी आपण होऊन तळहाती शिर घेऊन लढायला सज्ज होते. सारेच अद्‌भुत!

पण ते एक सत्य होते. तो इतिहास होता. कादंबरीपेक्षा अद्‌भुत. नाटकापेक्षा नाट्यमय, काव्यापेक्षा कल्पनारम्य! महाराज आणि त्यांचे मावळे इतिहास घडवायला सज्ज झाले होते!

अशी ही पहिलीच लढाई होती. आपले कोण आणि परके कोण हे ओळखता यावे म्हणून एक झेंड्याची तुकडी तयार झाली.

महाराजांनी हुकूम केला आणि मावळे दौडत निघाले. त्यांनी गर्द झाडी पार केली. ते मैदानावरून सुसाट दौडू लागले. महाराष्ट्राची धरती घोड्यांच्या टापा झेलू लागली. मावळ्यांना सुयश चिंतू लागली. स्वातंत्र्याची स्वप्ने पाहू लागली. सह्याद्रीचे कडे झुकू लागले. मावळ्यांची दौड पाहू लागले. मनोमनी रंगू लागले. आकाशातले तारे मावळ्यांची घोडदौड शेवटपर्यंत न्याहाळीत होते.

आणि पुरंदर ? शिवरायांचे स्वप्न उरी घट्ट धरून बसला होता !

फत्तेखानाची छावणी गाढ झोपली होती. सारे जग झोपले होते. जागे होते फक्त महाराज आणि त्यांचे मावळे.

मावळे वेगाने दौडत होते. दूरवर दिवट्या दिसू लागल्या. फत्तेखानाची छावणी जवळ आली.

मावळे थांबले. हळूहळू, अलगद, फुलाच्या पावलांनी चालू लागले. त्यांनी छावणी गाठली.

मावळे पांगले. त्यांनी छावणीला घेरा घातला. आणि चारी बाजूंनी शत्रूवर तुटून पडले. हाणा, मारा, कापा या आरोळ्यांनी छावणी दणाणून गेली. शत्रूच्या जखमी सैनिकांच्या किंकाळ्यांनी हलकल्लोळ उडाला. मावळे राहुट्या तंबू उद्ध्वस्त करीत सुटले. फत्तेखानाच्या सैनिकांची भीतीने गाळण उडली. झोपेतून उठून पळणारे सैनिक मावळ्यांच्या तलवारींना बळी पडले. जे अर्धवट झोपेत लढायला आले, त्यांना मावळ्यांनी कापून काढले. गवत कापावे तसे मावळे शत्रूला कापीत सुटले.

फत्तेखान जागा झाला. हातात तलवार घेऊन तो आपल्या

शामियान्याबाहेर पडला. मग एकेक खान बाहेर पडला. त्यांच्या फौजाही सज्ज होऊन रणात उतरल्या. खूप फौज जमली.

मावळ्यांनी ओळखले– आता पळायला हवे. शिंग वाजले. ती पळायची खूण होती. माघार घेऊन मावळे निघाले. पुरंदराच्या वाटेने दौडू लागले.

पण झेंड्याची तुकडी मागे राहिली. फत्तेखानाने तिच्यावर हल्ला केला. मराठ्यांचा झेंडा धोक्यात सापडला; पण इतक्यात एका निधड्या छातीच्या तरुण मावळ्याने झेंड्याकडे झेप घेतली झेंडा हातात घेऊन तो पुरंदराच्या वाटेने दवडू लागला. झेंड्याची तुकडी त्याच्या मागून दवडू लागली. झेंड्याचे रक्षण करणारा तरुण होता बाजी जेधे. कान्होजीराव जेध्यांचा मोठा मुलगा. महाराजांचा छोटा वीर !

फत्तेखानाने मावळ्यांचा पाठलाग केला. पण हा हा म्हणता ते गर्द झाडीत शिरले आणि दिसेनासे झाले !

मावळ्यांनी छावणीची दुर्दशा करून टाकली होती; त्यामुळे फत्तेखान चिडला. त्याचे सगळेच खान संतापले. त्यांनी पुरंदरावर हल्ला करायचे ठरविले.

फत्तेखान पुरंदरावर चालून येईल, याची महाराजांना अटकळ होतीच. त्यांनी गडाचा कडेकोट बंदोबस्त केला. तोफा तयार ठेवल्या, बंदुका सज्ज केल्या. मावळे, कोळी, रामोशी, महार यांचे सैन्य तयारीत ठेवले, पहारे पक्के केले. गस्त कडक केली. डोंगरावरची मेटे अधिक मजबूत केली.

फत्तेखानाचा लवाजमा प्रचंड होता. त्याचे हत्ती-घोडे तयार व्हायला बराच वेळ लागला. त्याचे विलासी सैनिक निघेपर्यंत

खान उतावीळ झाला. शेवटी कूचाची नौबत वाजली. फत्तेखानाचे हत्ती, घोडे, उंट पुरंदराची वाट चालू लागले.

फत्तेखान चिडून निघाला. मावळ्यांना चिरडायला निघाला. पुरंदर चेंदायला निघाला. स्वराज्याचा चुराडा करायला निघाला. शिवाजीला खाऊ की गिळू असे त्याला झाले होते. त्याची एवढी फजिती यापूर्वी कोणी केली नव्हती. अठरा वर्षांच्या शिवाजीने त्याची लांबलचक दाढी पार कापून टाकली होती !

मुलूख तुडवीत, प्रचंड रणघोष करीत, आरडाओरडा करीत खानाची फौज निघाली. वाटेतले गाव भयभीत झाले.

शेवटी फत्तेखान पुरंदरासमोर येऊन पोचला. खानाच्या फौजेने गडाकडे पाहिले. तिचे डोळेच गरगरले. पुरंदर चढणे काय सोपे होते ? सेनापती काय नि सैनिक काय, ऐषआरामात वाढलेले; हे लोक डोंगर काय चढणार ?

शत्रूच्या विरुद्ध गड लढविण्याची महाराजांची ही पहिलीच वेळ होती. समोर शत्रूची प्रचंड फौज होती. कसलेले सेनापती होते.

महाराजांनी युद्धाचा वेष अंगावर चढविला होता. डोकीला जाळीदार शिरस्त्राण होते. अंगात चिलखत होते. पाठीवर ढाल बांधली होती. कमरेला तलवार लटकवली होती. चेहऱ्यावर स्मित होते.

महाराजांनी बाजी पासलकर, कावजी मल्हार, गोदाजी जगताप, भीमाजी वाघ, शिवाजी इंगळे, बाजी जेधे या शिरवळच्या वीरांना जागा नेमून दिल्या. कामे वाटून दिली. केव्हा काय करायचे याबद्दलच्या सूचना दिल्या.

महाराज तयारीत होते.

फत्तेखानाची फौज डोंगर चढू लागली. सगळ्यात पुढे मुसेखान आणि त्याची फौज चढत होती. फत्तेखानाची फौज डोंगर चढत होती; पण पुरंदरवर शिवाजीची काहीच हालचाल दिसत नव्हती. शिवाजी भिऊन लपला तर नाही? लपून लपून कोठे लपणार? त्याला खेचून बाहेर काढू!

फत्तेखानाची फौज डोंगर चढत होती. आली, आली, खानाची फौज माऱ्याच्या टप्प्यात आली. महाराजांनी इशारा केला. पुरंदरावरील तोफ कडाडली– धडाड धूऽऽम! खानाच्या फौजांची गाळण उडाली. कित्येक सैनिक डोंगरावरून खाली कोसळले.

मागोमाग मावळ्यांनी बंदुकीच्या फैरी झाडल्या. बंदुकीच्या गोळ्या कोणाच्या डोक्यात, कोणाच्या छातीत, तर कोणाच्या पोटात शिरल्या.

लगोलग मावळ्यांनी खानाच्या फौजेवर बाणांचा पाऊस पाडला. गोफणींनी दगडांचा मारा केला. मोठमोठे खडक वरून लोटून दिले. खानाचे लोक पडले. कोसळले, ठार झाले. त्याच्या फौजेची दुर्दशा झाली. दैना उडाली. किंकाळ्यांनी डोंगर दणाणून गेला.

फत्तेखानाने पुन्हा नेट केला. त्याची फौज ईर्ष्येने डोंगर चढू लागली. त्याचे सेनापती फौजेला उत्तेजन देऊ लागले. तेही वर चढू लागले. आले, आले, पुढे आले! छान! महाराजांना हेच पहिजे होते. त्यांनी मावळ्यांना हुकूम केला– शत्रूला भिडा! कापून काढा!


भिमाजी, गोंदाजी, बाजी, कावजी धुंद होऊन गडाबाहेर पडले. एकेकाने शत्रूच्या एकेका सरदारखानाला गाठले. मावळे खानाच्या फौजेवर तुटून पडले. डोंगरावर भयंकर रणकंदन माजले. 'हरहर महादेव !' या गर्जनांनी डोंगर पुन्हा पुन्हा दणदणू लागला. शत्रूची मुंडकी सपासप उडू लागली !

इतक्यात मुसेखान पडला- कोसळला, ठार झाला. खानाची फौज घाबरली. सैरावैरा धावत सुटली. खानाच्या सरदारांना त्यांची फौज आवरेना. फौज पळू लागली. खान पळू लागले, शेवटी फत्तेखानही पळू लागला !

मावळ्यांना भयंकर अवसान आले. त्यांनी खानाच्या फौजेचा पाठलाग सुरू केला. खान आणि त्याची फौज जीव घेऊन पळाली. फत्तेखान विजापूरला पोचला. उरले सुरले थोडे सैनिकही पोचले. मराठ्यांनी खानाच्या फौजेचा संपूर्ण नाश केला !

पण पाठलाग करीत असताना बाजी पासलकर लढता लढता रणांगणावर पडले !

बाजी पासलकर म्हणजे महाराजांचा मोठा आधार होता. महाराज गहिवरले, दुःखी झाले अति कष्टी झाले.



# ३. रोहिडागडावर स्वारी

महाराजांना स्वराज्याचीच स्वप्ने दिसत होती. ताऱ्यांसारखी झगझगीत. लख-लखीत. डोळ्यांना दिपविणारी. हृदयात न मावणारी. शब्दात सांगता न येणारी !

स्वराज्य हा त्यांचा ध्यास होता. देव होता. सर्वस्व होते. स्वराज्यासाठी महाराजांनी आपली शक्ती, युक्ती आणि भक्ती पणाला लावली होती.

महाराजांनी हजार-बाराशे मावळ्यांसह रायरेश्वरापुढे घेतलेली शपथ मावळामावळात फैलावली. रायरेश्वरापुढील नंदादीपाची ज्योत दरीदरीत झेपावली. महाराजांनी शौर्य पेरले. महाराष्ट्राच्या मातीत, दरीत, कडेकपारीत आणि डोंगरात. शौर्य रुजले, स्वराज्य अंकुरले.

महाराजांचे सखेसौंगडी सुखावले. मावळे आनंदले. त्यांना आकाश ठेंगणे झाले. पण स्वराज्याची कल्पना सहन न होणारे अनेक देशमुख होते. ते महाराजांच्या चहाड्या विजापूरच्या सुल-तानाला सांगू लागले. त्यात कृष्णाजी नाईक बांदल हा प्रमुख होता.

कृष्णाजी बांदल हा हिरडस मावळचा देशमुख होता. त्याच्या जवळ दहा हजार सैन्य नेहमी खडे असे. तो जुना देशमुख. सगळ्या देशमुखांत आपल्याला मोठा समजे. कोणाला जुमानीत नसे. सगळ्यांकडून बळजबरीने वसूल गोळा करी. त्याने शहाजीराजांच्या

जहागिरीतही वसूल गोळा केला होता. दादोजी कोंडदेवांचा त्याने पराभव केला होता. आणि कान्होजी जेधे या पराक्रमी देशमुखाचाही पराभव केला होता. जेध्याचा कारीगाव त्याने साफ लुटला होता. असा कृष्णाजी मोठा बलदंड होता. शिरजोर होता.

कृष्णाजी बांदलाकडे बाजी प्रभू देशपांडे हा शूर सरदार होता. स्वतः बांदल पराक्रमी, कडवा आणि शूर होता. त्याचे सैन्य मोठे, चिवट आणि झुंजार होते. नीरा नदीच्या दक्षिण तीराचा मुलूख पूर्वेस शिरवळपर्यंत आणि दक्षिणेस कृष्णानदीच्या उत्तरेकडील डोंगरापर्यंतचा मुलूख त्याच्या ताब्यात होता. तो स्वतःला मावळचा राजा म्हणत असे. त्याचा रोहिडा किल्ला अत्यंत बळकट होता. म्हणून त्याच्या वाटेला कोणीही जात नसे.

कृष्णाजी बांदल महाराजांची हालचाल विजापूरच्या दरबारात कळवू लागला. महाराजांना हे आवडले नाही. बांदल स्वराज्य मुळातच नष्ट करायला बघत होता. त्याला ठेचायलाच हवे होते.

महाराजांनी कृष्णाजी बांदलाला ठेचायचे ठरविले. बेत आखले आणि आबाजी प्रभूवर सुरुवातीची कामगिरी सोपविली.

आबाजी प्रभू एकटाच निघाला– बांदलाच्या रोहिडागडाची माहिती काढायला. त्याच्या सैन्याची गणती करायला. त्याचे बळ अजमावायला !

रात्रीच्या काळोखात आबाजी रोहिडा किल्ल्यात शिरला. त्याने सगळा तट चालून पाहिला. चारपाच रात्री तो गडावर गेला. कधी काळाकुट्ट पोशाख करून, तर कधी पांढरे फटक कपडे घालून. एका रात्री तो बाजी प्रभूच्या ओटीवर जाऊन बसला. दुसऱ्या रात्री बांदलांच्या वाड्याच्या भिंतीला टेकून त्याने कानोसा घेतला. अनेक

वेळा त्याला पहारेकऱ्यांनी पाहिले. एकदोनदा त्यांनी त्याचा पाठलाग केला. पण आबाजी त्यांच्या हाती लागला नाही. तो तटावरून दिसता दिसता अदृश्य झाला.



पहारेकरी आबाजीला भूत समजले. त्या भयंकर भुताटकीला ते घाबरले. शेवटी त्यांनी बाजी प्रभू आणि कृष्णाजी बांदल यांच्या कानी भुताटकीचा प्रकार घातला.

पहारेकरी बदलले गेले. भुताटकी थांबली. पहारेकरी निर्भय झाले. ते पहिल्यासारखे बेसावध राहिले. गांजा-चरस ओढू लागले. डोलू लागले. पेंगू लागले. रंगू लागले. झोपू लागले !

त्यानंतरची पहिलीच अमावास्या रोहिडागडावर उतरली. गडद काळोखात गड बुडाला.

मध्यरात्र टळली होती. पहारेकरी डाराडूर झोपले होते.

इतक्यात गडाच्या तटाजवळ कसला तरी आवाज झाला. पहारेकरी दचकून जागा झाला. त्याने डोळे ताठ उघडले. समोर काही दिसले नाही. तो उठला चाचपडत तटाजवळ गेला. त्याने तटाखाली नजर टाकली. काळोखाशिवाय त्याला काहीही दिसले नाही. तो तेथेच थांबला. बऱ्याच वेळाने तटाबाहेरून काळोखाच्या लाटा किल्ल्याकडे वाहात आहेत, असा त्याला भास झाला. किल्ल्याच्या आत काळोख हालत आहे, असाही त्याला भास झाला. तो मागे वळला. दोन-चार पावले चालला. इतक्यात मागून त्याच्या कमरेत एक जबरदस्त लाथ बसली आणि तो जमिनीवर आडवा पडला तो उठलाच नाही.

त्या पहारेकऱ्याला भास झाला तो खराच होता. काळोखात तटाला शिड्या लावून शिवाजी महाराज आपला सरदार आबाजी विश्वनाथ प्रभू व फौज घेऊन किल्ल्यावर चढले होते.

महाराज फौजेसह पुढे निघाले. आबाजी वाटेतले पहारे दाखवीत होता आणि मावळे पहारे कापीत चालले होते.

शेवटी उरलेले पहारेकरी भयभीत होऊन पळत सुटले.

महाराज, कृष्णाजी बांदल आणि बाजी-प्रभू यांच्या वाड्या-पर्यंत येऊन पोचले.

बांदल व बाजी जागे झाले. शस्त्रसज्ज होऊन बाहेर आले. हुकूम सुटला. नगारा वाजला. बांदलाचे दहा हजार सैनिक नंग्या तलवारी हाती घेऊन धावत सुटले.

सगळीकडे काळोखच काळोख दाटला होता.

आबाजी प्रभूने तेवढ्यात चलाखी केली. जवळ उभी असलेली गवताची गंज त्याने पेटवून दिली. लख्ख प्रकाश पडला. शत्रू दिसला. मावळ्यांनी गवत कापावे तसे बांदलाच्या कडव्या लोकांना कापायला सुरुवात केली.

आबाजी प्रभू त्वेषाने शत्रू कापीत चालला. कृष्णाजी बांदल व बाजी प्रभू मावळ्यांशी लढत असलेले त्याने पाहिले. त्याने बांदलाकडे झेप घेतली.

बांदल आणि आबाजी यांची झुंज जुंपली. द्वंद्वयुद्ध सुरू झाले. तलवारीला तलवार भिडू लागली. आदळू लागली. सरसरू लागली. खणखणू लागली. कृष्णाजी बांदलाचे वय झाले होते, पण त्याची समशेर भयंकर तिखट होती. त्याने तरुण आबाजीला रोखून धरले; एवढेच नाही तर त्याच्यावर चार वार केले.

आबाजीला त्या वारांनी मरणाएवढे दुःख झाले. तो क्रोधाने पेटला. तो सूडभावनेने खवळला. त्याने बांदलावर भयंकर हल्ला केला. वारामागे वार करीत तो बांदलाला रेटीत निघाला. आबाजीने रौद्ररूप धारण केले.

बाजी प्रभूने बांदलाच्या मदतीला धावून जाण्याची शिकस्त केली. पण मावळ्यांनी त्याला पुरते घेरले होते.

बांदल आणि आबाजी यांचे अटीतटीचे युद्ध सुरू झालें. दातओठ खात ते एकमेकांवर घणाघाती वार करू लागले. ढाली खणाणू लागल्या.

आणि शेवटी आबाजीने एक भयंकर वार बांदलाच्या मर्मस्थानी हाणला. कृष्णाजी बांदल, तो कडवा देशमुख, एकदम एका बाजूला वाकला. खाली कोसळला. आणि त्याने शेवटचा आचका दिला.

" हरहर महादेव ! " मावळ्यांनी गर्जना केली !

आबाजी महाराजांकडे धावला. त्याने त्यांना मुजरा केला·

महाराज खूष होऊन म्हणाले, " शाबास आबाजी ! आज तुमच्या तलवारीनं कमाल केली. घरभेद्या, उर्मट बांदलाला योग्य शासन झालं. आता बाजी प्रभूला वळवून आणा. हा निष्ठावंत मर्द माणूस आमच्या पदरी राहायला लायक आहे. "

आबाजी प्रभू वळला. बाजी प्रभू जेथे लढत होता तेथे तो गेला. तो मोठ्याने म्हणाला, " बाजी प्रभू, तलवार थांबवा ! "

पण बाजी थांबला नाही. तो अधिक त्वेषाने लढू लागला.

आबाजीने अनेक वेळा सांगितले. पुन्हापुन्हा विनवणी केली; पण बाजी थांबला नाही.

मग आबाजीने मावळ्यांना हुकूम सोडला, " मागे हटा, तलवार थांबवा ! "

मावळे मागे हटले. बाजी प्रभूची तलवार आपोआप थांबली. तो घामाने निथळत होता.

" बाजी, माझं ऐका. महाराजांकडे चला."

" नको आबाजी ! अपमानापेक्षा मरण बरं. "

" बाजी, आमच्या महाराजांना तुम्ही ओळखलं नाही. तुमचा अपमान होणार नाही, याची हमी मी घेतो. "

" आबाजी " बाजी निराशेने म्हणाला, " सुरू करा तुमची तलवार. दोन हात होऊन जाऊ द्या ! मरेन किंवा मारीन पण ते लाजिरवाणं जिणं नको ! "

" बाजी, अधीर होऊ नका, " आबाजी अजीजीने म्हणाला. " माझ्याबरोबर चला. महाराजांची भेट घ्या. तुमचं समाधान झालं नाही तर दोन हात होतीलच ! "

बाजीला बरोबर घेऊन आबाजी शिवाजी महाराजांसमोर दाखल झाला. बाजीकडे पाहात महाराज उद्गारले,

" बाजी प्रभू, या. तुमचं शौर्य पाहून आम्ही खूष झालो."

बाजी शांतपणे उभा होता. शिवाजी महाराजांनी शिडी लावून किल्ल्यावर प्रवेश केला. या धाडसाने तो आधीच दिपला होता. आता ते शत्रूपक्षाच्या माणसाची स्तुती करीत होते. तो अधिकच दिपला.

" आबाजी, " महाराज म्हणाले, " मावळ्यांना आमचा हुकूम कळवा– बांदलांचे जे लोक शरण येतील त्यांना मारू नका. आम्हांला नाहक रक्तपात नको आहे. कृष्णाजी बांदल पडले. त्यांचं आमचं वैर संपलं. त्यांचा राणीवास सुरक्षित राखा. लूट होता नये ! "

शब्दाशब्दांतून ओथंबणारे महाराजांचे औदार्य पाहून बाजी प्रभू चकित झाला. आपण जेध्यांची कारी लुटली होती, जाळली होती, याची त्याला आठवण झाली. तो मनोमनी ओशाळला.

" बाजी," महाराज बाजीकडे पाहात म्हणाले, " आज वतनं वाढवण्याचे दिवस नाहीत. स्वातंत्र्यसंपादनासाठी आज वतनांची आहुती द्यायला हवी. परक्यांच्या जोखडाखाली हा तुमचा आमचा देश शतकानुशतकं चिरडला जात आहे. आमच्या देशात आम्ही परके झालो आहोत. परके या देशाचे मालक झाले आहेत. आमची देवळे, घरेदारे, वतनवाडी यांची परक्यांनी दिवसाढवळ्या आमच्या डोळ्यांसमोर लूटमार चालविली आहे. आमचे देव, मुलंमाणसं, आयाबहिणी आक्रोश करीत आहेत– शतकानुशतकं ! येथली आदिलशाही, कुतुबशाही आणि मोगल-

शाही समूळ नष्ट केल्याशिवाय आमच्या मायभूमीचा आक्रोश थांबणार नाही."

महाराजांचे विचार आणि आवेश पाहून बाजी प्रभू भारावून गेला.

"बाजी," महाराज पुढे बोलू लागले, "या देशातली परकी सत्ता उलथून टाकून हिंदवी स्वराज्य निर्माण करण्यासाठी रोहिडेश्वराला साक्ष ठेवून आम्ही शपथ घेतली आहे."

महाराजांचे शब्द ऐकून बाजीचे भावनाप्रधान हृदय उचंबळून आले.

"बाजी प्रभू ! तानाजी मालुसरे, येसाजी कंक, कान्होजी जेधे हे आणि इतर वीर आपलं घरदार, वतनवाडी आणि संसार यांवर ज्वलंत निखारा ठेवून आमच्या बरोबर आले आहेत. कशासाठी ? देशमुखीसाठी ? नाही. जहागिरीसाठी ? नाही. मग हा सर्वस्वाचा त्याग कशासाठी ? केवळ मायभूमीला दास्यातून मुक्त करण्यासाठी !"

आपण अंधारातून उजेडाकडे जात आहोत, धरतीवरून वर उंचउंच जात आहोत, एका कोंदट जगातून नव्या जगाकडे जात आहोत. असे बाजी प्रभूला वाटू लागले.

"बाजी," महाराज पुढे बोलले, "सामान्य माणसं पिढयान् पिढया आणि शतकानुशतकं अन्याय सहन करीत जगतात. पिढया जन्माला येतात, वाढतात आणि मरतात. पण अन्यायाविरुद्ध क्रांती करून उठण्याचं सामर्थ्य त्यांच्यात नसतं. ते त्यांच्यामध्ये निर्माण करावं लागतं. रावणानं देवांना कैदेत टाकलं. त्या सगळ्यांनी अन्याय सहन केला. पण एकटया श्रीरामचंद्रानं अन्या-

याला विरोध केला. त्यानं रावणाविरुद्ध सगळं दंडकारण्य उठवलं. हनुमान, सुग्रीव, नळ, जांबुवंत इत्यादी समर्थ वीरांना संघटित केलं आणि वानरसेनेला रावणाविरुद्ध युद्धाला उभं केलं."

बाजी प्रभू आपल्या हृदयाचे कान करून महाराजांचे बोल ऐकत होता.

"जेव्हा कंसाने आपल्या बहिणीवर अन्याय केला तेव्हा त्याला विरोध करायला सामान्य माणसातून कोणीच पुढे आला नाही. त्याला विरोध केला एकटचा श्रीकृष्णानं. शंभर कौरवांना विरोध केला फक्त पाच पांडवांनी आणि त्यांना साथ करायला उभा राहिला एकटा श्रीकृष्ण ! "

शिवाजी महाराज शूर आहेत असे आपण ऐकले होते. पण ते केवळ शूर नाहीत, ते असामान्य आहेत याची बाजी प्रभूला खात्री पटली. आपल्या समोर उभ्या असलेल्या पंचवीस वर्षांच्या तरुण शिवाजी महाराजांत प्रचंड सामर्थ्य असल्याचे त्याला मनोमनी पटले. एक प्रचंड तेजोवलय महाराजांभोवती पसरल्याचा त्याला भास झाला. त्याचे मन दिपले. डोळे दिपले. तेजाच्या झोतात तो न्हाऊन निघाला.

"बाजी प्रभू" महाराज पुढे म्हणाले, "हा देश स्वतंत्र व्हावा ही श्रींची इच्छा आहे. तो स्वतंत्र होणारच. पण त्यासाठी तुमच्यासारख्या निष्ठावंत पराक्रमी वीरांची आम्हांला गरज आहे. माझा एकेक सरदार म्हणजे अमोल रत्न आहे. तुमची गणना आम्ही या रत्नांत करतो."

बाजी प्रभू भारावला. त्याने महाराजांना मुजरा केला. तो महाराजांना म्हणाला,


" महाराज, आज माझी निष्ठा मी आपल्या चरणांवर वाहिली आहे. स्वराज्याच्या कार्यात माझा उपयोग व्हावा, जीवन सार्थकी लागावं, ही माझी इच्छा आहे. मायभूमीला स्वतंत्र करण्यासाठी माझं सर्वस्व द्यायला मी तयार आहे ! "

" धन्य बाजी तुमची ! "

महाराजांनी बाजीला मिठी मरली. बाजीला आनंद झाला. मावळ्यांना आनंद झाला. लढाई थांबली होती.

" महाराजांचा विजय असो ! "

मावळ्यांनी आनंदाने जयघोष केला. त्या जयघोषानें रोहिडा दणाणून गेला.



# ४. शृंगारपूरचा सूर्यराव

रायरेश्वरापुढे स्वराज्याची शपथ घेतल्यावर सोळा वर्षे लोटली. स्वराज्य आकार घेऊ लागले. महाराजांचे स्वप्न साकार होऊ लागले. राजगडावर चैतन्य खेळू लागले.

या सोळा वर्षांत महाराजांनी अनेक पराक्रम केले. अफझलखानासारखा दैत्य उभ्या उभ्या मारला. त्यामुळे विजापूरचा बादशहा नामोहरम झाला. औरंगजेब चरकला. महाराजांचा कीर्तिडंका त्रिखंडात गाजला. त्यानंतर महाराज पन्हाळ्यावरून सिद्दी जौहाराच्या वेढ्यातून सुरक्षितपणे निसटले. त्यामुळें विजापूरचा बादशहा हादरला. औरंगजेब दचकला. जंजिऱ्याचा हबशी गडबडला. गोव्याचा पोर्तुगीज विचारात पडला. आणि हिंदुस्थानातले इंग्रज, फ्रेंच व डच वखारवाले महाराजांच्या पराक्रमाने चकित झाले !

महाराजांच्या पराक्रमाने त्यांचे सखेसौगडी आनंदले. मावळ्यांनी जयघोष केले. जिजाबाई आईसाहेबांनी आपल्या नेत्रांच्या निरांजनांनी ओवाळिले !

पण बाकीचा महाराष्ट्र शांत होता. अलिप्त होता. गुलामीत घोरत होता.

महाराजांचा एकेक पराक्रम म्हणजे आनंदाची पर्वणी ! पराक्रमाचे पोवाडे गावे, महाकाव्य लिहावे, महानाटक रचावे असा

एकेक प्रसंग ! आनंदाने बेभान व्हावे, गुणगान करावे, मनसोक्त नाचावे अशी एकेक घटना !

पण महाराजांच्या यशाचे कौतुक करायला त्यांचा एकही नातेवाईक पुढे आला नाही. त्यांचे वडील शहाजीराजे यांनीही कौतुकाचा चकार शब्द काढला नाही. राजे म्हणून मिरवणारी अनेक मराठा घराणी होती. पण त्यांच्यापैकी कोणीही महाराजांच्या साहाय्याला आला नाही. उलट हे मराठी राजे संघटित होऊ लागले. महाराजांना विरोध करू लागले. विजापूरच्या बादशहाला साहाय्य करू लागले. म्हणून महाराजांना त्यांच्याकडे वळावे लागले.

अशा राजांत सूर्यराव सुर्वे हा एक होता.

सूर्यरावाचे राज्य कोकणात होते. त्याचे राज्य प्राचीन होते. श्रृंगारपूर हे त्याच्या राजधानीचे शहर. शृंगारपूर डोंगराच्या कपारीत वसले होते. त्याच्या सभोवार जंगल होते. जंगल दाट, अफाट आणि बिकट होते. त्या भयाण जंगलात शिरायला वाघही भ्यावा ! मेढाळगड, भैरवगड आणि प्रचीतगड हे त्याचे बळकट किल्ले होते. सूर्यरावाच्या सैन्यात शूर लढवय्ये लोक होते. स्वतः सूर्यराव शूर होता. श्रीमंत होता. आणि विजापूरच्या बादशहाचा आवडता होता.

श्रृंगारपुरात मेढाळगडाच्या उंच माचीवर सूर्यरावाचा राजवाडा होता. श्रृंगारपूरचे सृष्टिसौंदर्य संपन्न होते. वैभव मोठे होते.

सूर्यरावाला आपल्या प्राचीन राज्याची, बळकट राजधानीची, अलोट संपत्तीची, लढाऊ सैन्याची आणि स्वतःच्या शौर्याची मोठी घमेंड होती. तो महाराजांशी आरंभापासून वैर करू लागला. शेवटी तो त्यांचा कट्टा वैरी झाला.

जेव्हा जेव्हा संधी मिळाली तेव्हा तेव्हा सूर्यरावाने महाराजांना विरोध केला. महाराजांनी जावळीच्या चंद्रराव मोऱ्यावर स्वारी केली. सूर्यराव मोऱ्यांच्या मदतीसाठी धावला. पण तो आणि त्याची फौज जावळीत पोचण्यापूर्वीच महाराजांनी मोऱ्यांचा निकाल लावला. मोरे मोठा बलाढ्य. त्याचा पूर्ण नाश होताच सूर्यराव घाबरला. त्याने महाराजांना पत्र लिहिले–" मला सांभाळा, मला तुमचा क्रीतपुत्र समजा !" महाराज मोठ्या मनाचे. त्याने सूर्यरावाला दया दाखविली.

पण सूर्यराव शिवाजी महाराजांचे उपकार विसरला. सिद्धी जौहाराने पन्हाळगडाला वेढा घातला. महाराज वेढ्यात अडकले. त्यांच्या जिवावर संकट आले. त्या वेळी सूर्यराव सुर्वे महाराजांच्या विरुद्ध सिद्दीला सामील झाला. पालवणच्या दळवी राजाला बरोबर घेऊन त्याने महाराजांच्या विशाळगडाला वेढा घातला. महाराज पन्हाळगडावरून निसटले. ते विशाळगडाकडे निघाले सुर्वे व दळवी यांचा वेढा फोडून ते गडावर सुरक्षित पोचले. याही वेळी महाराजांनी सूर्यरावाला दया दाखविली !

मालवणला सूर्यराव महाराजांच्या शत्रूला मिळाला. महाराजांनी त्याला दया दाखविली. दाभोळला तो महाराजांच्या विरुद्ध लढला. महाराजांनी सुर्व्याला दया दाखविली !

महाराज इतक्या दयाळूपणाने कोणत्याही शत्रूशी वागले नव्हते; पण सूर्यराव सुर्वे मराठा होता; शूर होता, आपला होता. त्याला जवळ करावे, स्वराज्याच्या कामी लावावे, अशी महाराजांची इच्छा होती.

महाराजांनी सूर्यरावाला आणखी एक संधी दिली.

शिवाजी महाराज कोकणात स्वारीवर निघाले. त्यांच्याबरोबर पिलाजी नीळकंठराव सरनाईक आणि तानाजी मालुसरे होते. डोंगर चढत, घाट उतरत आणि जंगले पार करीत महाराज संगमेश्वरला येऊन पोचले. संगमेश्वरपासून जवळ दोन मराठी राज्ये होती. श्रृंगारपूरला सूर्यराव सुर्व्यांचे आणि पालवणला जसवंतराव दळव्यांचे. दोघेही महाराजांचे वैर करीत.

हे दोघे वैरी संगमेश्वरला गडबड करतील म्हणून पिलाजी व तानाजी या दोन्ही सरदारांना तेथे ठेवून महाराज राजापूरच्या दिशेने निघाले. संगमेश्वरचे रस्ते सुधारावे असा दोघांना आदेश देऊन ते पुढे निघाले. जाताजाता सूर्यरावाला निरोप धाडला, मराठी फौजेला त्रास देऊ नये.

संगमेश्वर गावाच्या बाहेरील अफाट मैदानावर मराठी सैन्याचा तळ पडला होता.

महाराजांच्या आज्ञेप्रमाणे रस्ते सुधारण्याचे काम जोरात सुरू झाले. कुदळी खणखणू लागल्या. फावडी खरखरू लागली. तांबड्या मातीची पिंजर उडू लागली. मावळ्यांची अंगे रंगू लागली. घामाने माती भिजू लागली.

दिवसा रग्गड काम करावे आणि रात्री उघड्या मैदानावरील राहुट्यांत गाढ झोपावे, असा मराठ्यांचा कार्यक्रम सुरू झाला.

मराठे निर्धास्त होते.

आणि एका रात्री मराठ्यांवर भयंकर संकट कोसळले.

माघाचा महिना होता. मध्यरात्रीची वेळ होती. संगमेश्वर शांत होते. डोंगर शांत होते. जंगल शांत होते. पिलाजी, तानाजी आणि त्यांच्या फौजा गाढ झोपल्या होत्या.



सूर्यराव सुर्वे आणि जसवंतराव यांनी एक भयंकर कारस्थान रचले होते. आपल्या फौजा घेऊन मांजराच्या पावलांनी ते संगमेश्वरात दाखल झाले. त्यांनी मराठ्यांचा तळ गाठला. तळाला घेरा घातला आणि गाढ झोपेत असलेल्या मराठ्यांवर त्यांनी चारही बाजूंनी हल्ला केला.

तलवारीचे वार कचाकच होऊ लागले. बेसावध मावळ्यांची कत्तल होऊ लागली.

आणि पिलाजी, तानाजी आणि मावळे खडबडून उठले. तळावर अंधार पडला होता.

पिलाजी आणि तानाजी यांनी हुकूम सोडला. आपापल्या

फौजा लढाईला उभ्या केल्या. शिंगे वाजली. ‘हरहर महादेव !’ अशी रणगर्जना करीत मावळे शत्रूवर तुटून पडले.

पिलाजी आणि तानाजी त्वेषाने लढू लागले.

पण सूर्यरावाने हिंमत केली. त्याने आपली फौज मध्ये घुसविली. तो पिलाजीच्या सैन्यावर घसरला. त्याचा रेटा पिलाजीला सोसवेना. तो मागे हटू लागला.

तानाजीने मात्र जसवंतरावाचा फडशा पाडायला सुरुवात केली.

पण घात झाला. सूर्यरावाने पिलाजीवर जोराचा हल्ला केला. पिलाजी मागे हटला आणि पळू लागला.

आणीबाणीची वेळ होती. तानाजी धावला. त्याने पिलाजीची मानगुट पकडली. त्याला एका सुळकेवजा मोठ्या खडकाला बांधून टाकले.

तानाजीने पिलाजीच्या पळणाऱ्या फौजेला थांबविले. तो म्हणाला, “ भ्याडांनो, पळता कुठं ? पळून जीव वाचवणार आहात तो कशासाठी ? आजारी पडून मरण्यासाठी ? बाजी प्रभूचे मावळे लढता लढता मेले. पण मागे हटले नाहीत. महाराज काय म्हणतील तुम्हाला ? मागं फिरा. सूर्यराव बेइमान झाला. त्यानं विश्वासघात केला. त्याचा सूड घ्या ! ”

मावळे मागे फिरले. त्यांना चेव आला. “ हरहर महादेव ! ” मावळ्यांची गर्जना आकाशाला भिडली.

संगमेश्वरच्या मैदानावर रणकंदन सुरू झाले. मावळे आवेशाने लढू लागले. विश्वासघातकी शत्रूवर तुटून पडले. कोकणची तांबडी माती रक्ताने भिजू लागली.

चार-पाच तास घनघोर लढाई झाली. रात्र सरू लागली. आसपासच्या गावांत पहाटेचे कोंबडे आरवू लागले.

आणि सूर्यराव पळू लागला. जसवंतराव पळू लागला. दोघांच्या फौजा पळू लागल्या.

मावळ्यांचा जय झाला.

महाराजांना राजापूरला ही बातमी कळली. ते माघारी फिरले, तडक संगमेश्वरला आले. त्यांनी सूर्यरावाकडे जासूद रवाना केला. त्याला निरोप पाठविला— ताबडतोब येऊन भेटावे.

आणि महाराज जसवंतराव दळव्याचा समाचार घ्यायला निघाले. जसवंतराव पळू लागला. महाराजांनी त्याचे राज्य काबीज केले.

अजून सूर्यराव महाराजांना भेटायला आला नव्हता.

सूर्यराव का आला नाही ? कसा येणार तो आता ? कारण विजापूरच्या बादशहाने त्याला कोकणात आपला सरसेनापती नेमले होते. शिवाजीला नेस्तनाबूद करण्याची कामगिरी त्याच्यावर सोपविली होती. बादशहाचा पूर्वीचा सरसेनापती होता रुस्तुमजमान. त्याच्या जागी सूर्यराव सुर्वे आला. दोन मराठ्यांनी आपसांत झुंजावे, मरावे आणि आपण सुखाने राज्य करावे, हा बादशहाचा डाव होता. पण हा डाव सूर्यरावाच्या टाळक्यात शिरला नाही. आपण बादशहाचे सरसेनापती झालो या गोष्टीने त्याला आकाश ठेंगणे झाले. तो मराठी रक्त विसरला, स्वराज्य विसरला. देश विसरला. चढून गेला !

महाराजांना ही हकिकत कळली. ते संतापले. मराठा तितुका मेळवावा, आपला करावा, स्वराज्याच्या कामी लावावा

म्हणून महाराजांनी सूर्यरावाचे अनेक अपराध पोटात घातले होते. पण तो दगाबाज निघाला. महाराजांनी त्याला अनेकदा सांगितले; त्याने ऐकले नाही. त्याला शिकविले, पण तो शिकला नाही. त्याला समजावले, पण त्याने समजून घेतले नाही. सूर्यरावाची गय आता होणार नाही. त्याचा नाश केलाच पाहिजे.

महाराज चिडले होते सुर्व्यांच्या दगाबाजीवर. पठाण, तुर्क, मोगल यांनी या देशावर आक्रमण केले. त्यांनी या देशात दगाबाजी आणली. त्यांनी आक्रमण करावे, आम्ही ते सोसावे. त्यांनी केलेला तह मोडावा, आम्ही तो पाळावा. यामुळे हा देश बुडाला ! छे ! छे ! यापुढे हे धोरण चालणार नाही आम्ही हे चालू देणार नाही !

दगाबाज सूर्यरावाला, विजापूरच्या सरसेनापतीला, बुडवायला महाराज निघाले.

पंधरा हजार मराठी फौज श्रृंगारपूरच्या वाटेला लागली. घोड्यांच्या टापांनी तांबड्या मातीचा गुलाल उडू लागला. झाडे रंगू लागली. वाटेतली जंगले थरथरू लागली.

महाराज मेढाळगड चढले. सूर्यरावाच्या राजवाड्यात त्यांनी त्वेषाने पाऊल टाकले. पण सूर्यराव कोठे होता ?

सूर्यराव घाबरून अगोदरच पळाला होता. तो विजापूरचा सरसेनापती झाला आणि स्वतःचे राज्य गमाऊन बसला.

सूर्यरावाच्या घराण्यातील स्त्री-पुरुष-मुले महाराजांना शरण आली. महाराजांनी त्यांना अभय दिले. त्यांच्या निर्वाहाची तरतूद केली.

श्रृंगारपूर पाहून महाराज खूष झाले. तेथील सृष्टिसौंदर्य त्यांना आवडले. महाराजांचे मन शांत झाले !

◻ ◻ ◻

# ५. पोर्तुगीजांचा पराभव

कार्तिक महिन्याचे अखेरचे दिवस होते. कुडाळातली भातकापणी नुकतीच संपली होती. लोकांच्या खळयांवर भाताच्या पिवळ्या राशी उभ्या होत्या. पीक चांगले आले होते. शेतकरी आनंदले होते. घरोघरच्या सुवासिनी सुखावल्या होत्या.

कुडाळची भंगसाळ नदी संथपणे वाहात होती. नदीच्या दोन्ही काठांवरील शेतमळे कापणी झाल्यामुळे उघडेबोडके दिसत होते. झाडे गर्द हिरवी दिसत होती. हवा आल्हाददायक होती.

भंगसाळ नदीच्या पलीकडे पणदूरच्या तिठ्याजवळील अफाट मैदानावर शिवाजी महाराजांचा तळ पडला होता. तळावर अकरा हजार पायदळ आणि एक हजार घोडेस्वार उत्साहाने कामे करीत होते तळावरील तंबू व राहुटया सैनिकांनी गजबजल्या होत्या. महाराजांचा शामियाना शांत होता.

रात्र झाली. कुडाळ काळोखात बुडाले. तळावर दिवटया व मशाली आपल्या तांबडया प्रकाशाने चमकू लागल्या.

शामियान्यात महाराजांची आपल्या सेनानींशी बराच वेळ बैठक चालू होती. महाराजांनी आपला बेत सगळयांना समजावून सांगितला. बैठक संपली. सेनानी आपापल्या तंबूकडे निघून गेले.

बरीच रात्र झाली. गार वाऱ्याच्या झुळुका वाहू लागल्या. महाराज जागेच होते. गोव्यातून आलेल्या बातमीने ते अस्वस्थ झाले होते. बातमी अशी होती– गोव्याच्या पोर्तुगीज व्हाइसरॉयने

एक जुलमी हुकूम काढला होता. त्या हुकुमाप्रमाणे पोर्तुगीजांच्या ताब्यातील प्रदेशात राहाणाऱ्या हिंदूंना दानधर्म पाळण्याची बंदी झाली होती. एवढेच नाही तर पोर्तुगीज पाद्रयांनी हिंदूंना बाटवायला सुरुवात केली होती. त्या दिवशी सकाळी एक ब्राह्मण महाराजांना भेटला होता व त्याने त्यांना आपली कर्मकहाणी सांगितली होती.

त्या कहाणीने महाराज अस्वस्थ झाले होते. हिंदुस्थानात हिंदूंना आपला धर्म पाळायला बंदी करणारे पोर्तुगीज कोण ? पोर्तुगीजांचा सगळा इतिहास महाराजांना आठवला. व्यापारी म्हणून पोर्तुगीज केरळच्या किनाऱ्यावर उतरले. त्यांना उतरायला जागा देणाऱ्या उपकर्त्या झामोरीन राजाचा त्यांनी कपटाने नाश केला. गोव्यावर आक्रमण करून तो प्रदेश बळकावला. हिंदूंना छळले, बाटवले. त्यांना देशोधडीस लावले. आपल्याला विरोध करणाऱ्या सावंतवाडीच्या मुलखातील देसायांना पोर्तुगीजांनी गोव्यात आश्रय दिला. एवढेच नाही, हे पोर्तुगीज स्वतःला सागराचे धनी समजतात. या सागरात गलबत चालवायचे तर यांची लेखी परवानगी घ्यावे लागते ! वा रे वा !

हा इतिहास आठवला आणि महाराजांचे डोळे रागाने लाल भडक झाले. देशावर आक्रमण करणाऱ्या, सागरावर आक्रमण करणाऱ्या, धर्मावर आक्रमण करणाऱ्या, लोकांवर जुलूम करणाऱ्या, देसायांना आश्रय देणाऱ्या पोर्तुगीजांचा महाराजांना संताप आला.

सकाळ झाली. गार वारे वाहू लागले. फौजेची तयारी झाली. कूचाची नौबत वाजली.

महाराज अश्वारूढ होऊन फौजेसमोर आले. शब्दांत सांगता येणार नाही असे महाराजांचे रूप पाहून मराठी सेना उत्साहित झाली. तिने त्यांच्या डोळ्यांत युगायुगाची स्वप्ने पाहिली. हजारो सूर्यांचा प्रकाश थिटा वाटावा, असे तेज महाराजांच्या चेहऱ्यावर विलसत आहे, असे फौजेला वाटले.

गोव्याच्या रोखाने महाराज निघाले.

गोव्याची सरहद्द जवळ आली. सरहद्दीवर भतग्राम नावाचा महाल होता. तेथे 'खळो शेणई' हा देसाई होता. त्याच्याकडे पंचवीस गावांची जहागीर होती. महाराजांनी चुटकीसरशी त्यांची गावे जिंकून घेतली. खळो शेणई घाबरून पळाला. त्याने आग्वादचा पोर्तुगीजांचा किल्ला गाठला. तो पोर्तुगीज व्हाइस-रायच्या पायावर पडला. त्याने त्याची विनवणी केली. आश्रय मागितला. काय म्हणावे या स्वाभिमानशून्य लोकांना? जे लोक गुलामीत जन्मले त्यांचे जिणे शिळे झाले. ज्यांनी परक्यांना धनी मानले त्यांचे जन्म व्यर्थ गेले. जे देशाला विसरले ते फुकट जन्माला आले!

खळो शेणई पोर्तुगीजांच्या आश्रयाला गेला हे बरेच झाले. महाराजांना गोव्यात घुसायला कारण मिळाले. मराठ्यांनी देसाई याचा पाठलाग केला. ते बारदेशात शिरले. दहा मैल आत घुसले.

महाराजांनी पोर्तुगीज पाद्र्यांना हुकूम सोडला-हिंदूंना बाटवू नका. त्यांचा छळ ताबडतोब थांबवा. पण चार पाद्री उर्मट निघाले. त्यांना पोर्तुगीज सत्तेची घमेंड चढली. त्यांनी महाराजांचा हुकूम मानला नाही. त्यांनी हिंदूंचा छळ चालूच ठेवला.

महाराज संतापले. त्यांनी आपली माणसे पाठविली. चारही पाद्र्यांना त्यांनी पकडून आणले. महाराजांसमोर उभे केले.

कोणाला दया दाखवावी आणि कोणाला दया दाखवू नये, हे महाराज चांगले जाणत होते. पाद्री म्हणजे धर्म जाणणारी माणसे. पण या पाद्र्यांनी धर्माविरुद्ध वर्तन केले होते. त्यांनी माणुसकीला काळिमा फासला होता. ते दयेला पात्र नव्हते. त्यांना शासन व्हायलाच हवे होते. महाराजांनी हुकूम केला. चारही पाद्र्यांचा शिरच्छेद झाला.

महाराजांनी पोर्तुगीजांना धडा शिकवायचे ठरविले. कारण जशास तसे वागल्याशिवाय दुष्ट माणसे शहाणी होत नाहीत. ठोशास ठोसा दिल्याशिवाय जुलूमशहा वठणीवर येत नाहीत. तलवारीला तलवार भिडल्याशिवाय शत्रू शरण येत नाहींत.

महाराज मराठी फौजेला म्हणाले, "पोर्तुगिजांनी आमच्या प्रजेला छळले आहे. आम्ही हे सहन करू शकत नाही. त्यांना वठणीवर आणलेच पाहिजे. आमची प्रजा म्हणजे यांना काय गवतपाचोळा वाटला ? आमच्या रयतेला कोणीही वाली नाही, असे यांना वाटले काय ? चला, घुसा पोर्तुगीज गावात !"

पोर्तुगीजांच्या धार्मिक जुलमाने मराठी फौज अगोदरच चिडली होती. महाराजांचा शब्द म्हणजे मराठ्यांना देवाचा शब्द !

मराठे तळावरून निघाले. त्यांनी पोर्तुगीजांच्या गावांवर हल्ले केले. तीन दिवस मराठे पोर्तुगीजांचा प्रदेश लुटीत होते. त्यांनी सोळा गावे लुटली. सोळाशे माणसे कैद केली, गाई-गुरे पकडून नेली. पोर्तुगीजांचा मुलूख बेचिराख केला. दीडशे लाख पगोडे इतकी संपत्ती जमा केली.


मराठ्यांच्या दणक्याने पोर्तुगीज व्हाइसरॉय घाबरला. त्याचे डोळे उघडले त्याने हिंदूवर अन्याय करणारा जुलमी हुकूम

रद्द केला. देसायांना गोव्याबाहेर हाकून देण्याचे कबूल केले. त्याने लढाई थांबविण्याची महाराजांना विनंती केली.

महाराजांनी लढाई थांबविली. पण ते गोव्यातच राहिले.

पोर्तुगीजांनी श्रीसप्तकोटीश्वराचे देऊळ उध्वस्त केले होते. महाराजांनी ते पुन्हा उभारावयाचे ठरविले. त्यांनी आपल्या कारभाऱ्यांना ते काम सांगितले. ताबडतोब सामानाची तयारी झाली. मुहूर्त ठरला. देवालयाच्या बांधकामास सुरुवात झाली.

मोठ्या समाधानाने महाराज राजगडास परतले.



# ६. दंडाराजपुरीची दाणादाण

शिवाजी महाराजांनी या देशाला स्वतंत्र करण्यासाठी जी झुंज दिली तिला जगाच्या इतिहासात तोड नाही.

महाराजांना या देशाची भूमी स्वतंत्र करायची होती आणि समुद्रही स्वतंत्र करायचा होता. समुद्र स्वतंत्र करण्यासाठी त्यांनी जी पुन्हा पुन्हा झुंज दिली त्यातल्या एका झुंजीची ही कथा.

ही कथा आहे दंडाराजपुरीची.

मुंबईच्या दक्षिणेला पंचेचाळीस मैलावर जंजिरा नावाचे एक बेट आहे. राजपुरी खाडीच्या तोंडावरच ते वसले आहे. बेटापासून अर्ध्या मैलावर कुलाबा जिल्ह्यास राजपुरी हे गाव आहे. राजपुरीपासून दोन मैलांवर दंडा हे गाव आहे. दंडाही खाडीच्या किनाऱ्यावर आहे. दंड्याला एक किल्ला आहे. राजपुरी व दंडा ही दोन गावे असली तरी त्या काळी दंडराजपुरी या एका नावाने ती ओळखली जात असत.

जंजिरा तसे भाग्यवान बेट होते. कारण दिल्लीचे राज्य बुडाले तरी जंजिरा स्वतंत्र होता. देवगिरीचे राज्य बुडाले तरी ते बेट स्वतंत्र होते. दक्षिणेत सुलतानांची राज्ये आली तरी ते चिमुकले बेट स्वतंत्र होते. किती वर्षे? सुलतानांची राज्ये आल्यावर सुमारे दोनशे वर्षे.

हजारो उन्हाळे, पावसाळे आणि हिवाळे जंजिरा बेट स्वतंत्र

होते. बेटावर कोळी लोकांची वस्ती होती. घरोघर सुख नांदत होते. सण साजरे होत होते. संस्कृती वाढत होती.

बेटावरचे कोळी कष्टाळू होते. सभोवतालच्या अथांग सागराशी त्यांची शतकांशतकांची ओळख होती. ते मोकळ्या मनाचे, प्रामाणिक आणि सदाचारी होते. राम पाटील हा कोळ्यांचा नायक होता. बेटावर एक मेढेकोट होता. राम पाटील मेढेकोटात राहात असे. तो त्या बेटाचा राजाच होता म्हणा ना.

सभोवताली समुद्र पसरल्यामुळे बेट सुरक्षित होते. राम पाटील निर्धास्त होता.

अशा या बेटावर मुसलमानांची कपटी नजर पडली. जुन्नरच्या मलिक अहमद याने जंजिरा बेट जिकण्याचे ठरविले. त्याने बेटाला घेरले. बेटावर हल्ला केला. पण शूर कोळ्यांनी त्याचा पराभव केला.

राम पाटील आणि त्याचे कोळी बेटावर सुखाने राहू लागले. पण मलिकच्या स्वारीने ते शहाणे झाले नाहीत. ते बेसावध राहिले.

चार वर्षे निघून गेली.

आणि एक दिवस दगा झाला. दगाबाजीने जंजिऱ्याचा घात केला. कोळ्यांचे गळे कापले. त्यांचे संसार उध्वस्त केले.

संध्याकाळची वेळ होती. जंजिऱ्याच्या स्वातंत्र्याची ती शेवटली संध्याकाळ होती. झाडाझाडांवर पक्षी किलबिलाट करीत होते. मेढेकोटात तटाच्या सावल्या लांबत होत्या. समुद्राच्या लाटा बेटाच्या कडेला धडकत होत्या.

त्याच वेळी खाडीत काही गलबते नांगरली जात होती. थोड्या वेळाने एक लहान गलबत बेटाला लागले त्यातून तीन

माणसे बेटावर उतरली. त्यांनी कोळयांच्या नायकाची भेट घेतली. त्यातला एक माणूस कोळयांच्या नायकाला म्हणाला– "मी व्यापारी आहे. हे माझे नोकर आहेत. आम्ही सुरतेहून आलो. समुद्र फार खवळला आहे. वादळ होण्याचा संभव आहे. आजच्या रात्री आम्हांला किल्ल्यात आसरा द्या. मालाचे पेटारे ठेवायला जागा द्या. आम्ही उद्या सकाळी निघून जाऊ."

राम पाटलांची त्यांनी पुन्हा पुन्हा विनवणी केली. त्याला त्यांची दया आली. त्याने त्या व्यापाऱ्याला–पेरीमखानाला–परवानगी दिली.

पेरीमखान खूश झाला. त्यांच्या नोकरांनी मालाचे मोठमोठे पेटारे किल्ल्यात आणले.

जंजिरा बेटावर रात्र उतरली.

पेरीमखानाने उपकाराची फेड लगेच केली. त्याने राम पाटील आणि त्याच्या कोळयांना दारूचे पेटारे दिले. दारू कोळयांची फार आवडती होती. भराभर पेटारे फुटले. दारूच्या बाटल्या वाटल्या गेल्या. कोळी पेले भरभरून दारू प्याले, अतोनात प्याले आणि नशेत पडून राहिले. संपूर्ण बेटाला नशा चढली.

मध्यरात्र झाली. पेरीमख़ानाने आपले मालाचे पेटारे भराभर उघडले. प्रत्येक पेटाऱ्यातून एकेक हबशी सैनिक बाहेर आला. प्रत्येक सैनिक काळाकभिन्न, राकट आणि धिप्पाड होता. ते सुमारे सव्वाशे होते. पेरिमखानाने हुकूम दिला आणि ते हबशी लांडग्यासारखे कोळयांवर तुटून पडले. नशेने धुंद झालेल्या कोळयांना त्यांनी कापून काढले. कोळयांची बेसुमार कत्तल झाली.

दुसरा दिवस उजाडला. आता बेटावर कोळयांचे राज्य नव्हते. कोळीही नव्हते. आता जंजिऱ्यावर हबशांचे राज्य झाले

होते. हबशांनी मैत्रीचा खून केला. औदार्याचा खून केला आणि बेटावर एक क्रूर राज्य स्थापन केले.

पुढे पेरिमखान मेला. त्याच्या जागी बुऱ्हाणखान आला. त्याने एक प्रचंड दुर्ग बांधला. त्याचेच नाव जंजिरा.

जंजिरा एक बळकट किल्ला होता. त्याचे तट मजबूत होते. तटात सतरा बुरूज होते. बुरूज प्रचंड होते. मजबूत होते. तटावर चारही बाजूंना तोफा होत्या. किती ? सुमारे सहाशे. या तोफांत एक प्रचंड तोफ होती. तिचे नाव होते कलाल बांगडी.

असा हा बळकट जलदुर्ग हबशांचे निवासस्थान झाला. अफाट समुद्रामुळे जंजिरा अजिक्य ठरला. हबशी अत्यंत क्रूर होते, कपटी होते, लुटारू होते. ते समुद्रावरील जहाजे लुटीत. किनाऱ्यावरील गावे लुटीत. सुंदर बायका पळवीत. तरुण पुरुषांना धरून नेत. त्यांना गुलाम म्हणून विकीत. किनाऱ्यावरील उभी शेते कापून नेत. हबशी म्हणजे काळेकुट्ट राक्षस होते. धिप्पाड सैतान होते. कपटी दरोडेखोर होते. हबशांनी कोकणाला हैराण केले होते.

शिवाजी महाराजांच्या वेळी सिद्धी फत्तेखान हा हबशांचा सेनापती होता. त्याच्या ताब्यात जंजिरा बेट व किनाऱ्यावरील दंडा-राजपुरी ही गावे. दंडचाचा किल्ला व इतर सहा किल्ले होते.

सिद्दी फत्तेखान क्रूर होता. त्याच्या हाताखाली सिद्दी संबूल, सिद्दी कासिम व सिद्दी खैर्यत हे तीन सेनापती होते. ते अत्यंत क्रूर व कपटी होते.

महाराजांच्या मुलखाला हबशी वारंवार त्रास देत. गावे लुटीत, घरे जाळीत, बायका पळवीत, उभी शेते कापीत आणि अनेक वाईट कृत्ये करीत. ते विजापूरचा सुलतान व दिल्लीचा

औरंगजेब यांच्या अंकित होते. ते महाराजांच्या विरुद्ध इंग्रज व पोर्तुगीज यांनाही सामील होते.

सिद्दी फत्तेखान आणि त्याचे सेनानी महाराजांशी वैर करीत. संधी मिळे तेव्हा ते मराठ्यांच्या मुलखाला त्रास देत. अफजलखान महाराजांवर चालून आला तेव्हा फत्तेखान स्वराजातली गावे जिंकण्यासाठी किनाऱ्यावर उतरला होता; पण अफजलखान ठार झाल्याची खबर लागताच तो जंजिऱ्याला पळून गेला. महाराज पन्हाळगडावर अडकून पडले, तेव्हाही फत्तेखानने महाराजांच्या मुलखावर स्वारी केली होती. हे शल्य महाराजांच्या मनात सलत होते.

महाराजांनी ठरविले– जंजिऱ्याच्या हबशांना नष्ट करायचे. त्याचा मुलूख काबीज करायचा. समुद्र जिंकायचा. त्यांनी सैन्याची तयारी केली. रघुनाथ बल्लाळ, सबनीस सिद्दीवर स्वारी करायला निघाला. त्याच्या बरोबर सुमारे सात हजार पायदळ होते. मराठे हबशांना चेचीत निघाले. सिद्दीच्या फौजांनी निकराने झुंज दिली. पण मराठे जोरात होते. त्यांनी हबशी-फौज मारून काढली. मराठ्यांनी राजपुरी गाठली. सिद्दी जेरीला आला. त्याने मराठ्यांशी तह केला. रघुनाथ बल्लाळाला वस्त्रे दिली. घोडा दिला. यशस्वी होऊन मराठे मागे परतले.

पण सिद्दी फत्तेखान मोठा अविश्वासू, दगाबाज आणि कपटी होता. त्याने आपला शब्द मोडला. तह मोडला महाराजांच्या मुलखात पुन्हा उपद्रव सुरू केला.

महाराजांनी शामराजपंत पेशव्याला जंजिऱ्यावर पाठविले. सिद्दी खैर्यतखानाने कपट केले. त्याने पेशव्यांशी गोड बोलणे सुरू

केले. त्याला किल्ल्यात भेटीस बोलाविले. पेशवा गोड बोलण्याला भाळला. फसला. खानाला भेटायला किल्ल्यात गेला आणि सिद्दी खैर्यतखान सापासारखा उलटला. त्याने पेशव्याला कैद केले. आता काय करावे ? पेशवा बावरला. त्याने दुसरी चूक केली. पुन्हा जंजिऱ्यावर स्वारी करणार नाही, असे त्याने कबूल केले. खानाने त्याला सोडले. नामुष्की पतकरून पेशवा परत आला.

शामराजपंत पेशवा खानाच्या कपटाला फसला. कैद झाला. शत्रूला शरण गेला. त्याने मराठ्यांची बेइज्जत केली. महाराजांना हे आवडले नाही. ते रागावले. त्यांनी शामराजपंताला पेशवेपदावरून काढून टाकले.

त्यानंतर दहा वर्षे लोटली.

पण महाराज जंजिऱ्याला विसरले नव्हते.

महाराजांनी सिद्दीवर स्वारी करण्याचा निर्धार केला. लढाईचे बेत आखले. सैन्याची जंगी तयारी केली. सिद्दीचे जमिनीवरचे किल्ले जिंकायचे, दंडाराजपुरी जिंकायची आणि फत्तेखानाला नामोहरम करायचे, असा महाराजांनी बेत केला.

सकाळची वेळ होती. हवा प्रसन्न होती. नौबत झडली.

महाराज निघाले. सोबत मोरोपंत पेशवे होते. मावळ्यांची फौज होती. हेटकऱ्यांची फौज होती. महाराज सिद्दीच्या मुलखाच्या रोखाने निघाले. मराठी आरमार राजपुरी खाडीच्या दिशेने चालू लागले.

त्या वेळी सिद्दी फत्तेखान दंडाराजपुरीला होता. त्याला खबर लागली. पण तो आपल्या बळाच्या धुंदीत होता. कारण तो स्वतः शूर होता. त्याची फौज कसलेली होती. त्याच्या तोफा प्रचंड होत्या.

मराठे सिद्दीच्या मुलखात घुसले. वाघाच्या छातीने. सिंहाच्या हिमतीने. हत्तीच्या शक्तीने. हबशांना मारायचेच या निश्चयाने ! सिद्दी फत्तेखान लढाईला उभा राहिला. त्याचे अक्राळ-विक्राळ हबशी रणात उतरले. संग्रामाला सुरुवात झाली. रणकंदन झाले. मराठ्यांनी हबशांचे चंदन उडवले. तोफा धडाडल्या. धरती हादरली. आगीचा डोंब उसळला. रणकुंड पेटले. हबशांची आहुती पडू लागली.

हबशांनी प्रखर विरोध केला. ते जिवावर उदार होऊन लढले. त्यांनी शर्थीची झुंज दिली. पण मराठे हट्टाला पेटले होते. मावळ्यांचा आवेश आकाशाला भिडला. हेटकऱ्यांनी पराक्रमाची हद्द केली. त्यांनी सिद्दीच्या गडागडाला वेढा दिला. हबशांचे क्रूर चेहरे तटातटावर डोकावले. मराठ्यांनी बाणांनी हबशांना अचूक टिपले. बुरुजावर तोफांनी आग ओकली. हबशांना पोळून, भाजून, जाळून टाकले. मराठ्यांची आग हबशांना सोसवेना. हबशी लढाईला टिकेना.

मराठ्यांनी सिद्दीचे गडामागे गड घेतले. ते दंडाराजपुरी-कडे वळले. त्यांचा रोख होता दंड्याच्या किल्ल्याकडे. धरतीला नमवीत मराठी फौज निघाली. सिद्दी फत्तेखानाची घाबरगुंडी उडाली. हृदयाचा थरकाप झाला. तो मदतीसाठी दाही दिशा धुंडू लागला.

सिद्दी फत्तेखानाला अल्ला आठवला. इंग्रज आठवला. आदिलशहा आठवला. आणि औरंगजेब आठवला. खानाने विचार केला– शिवाजीपासून मला कोण वाचवील ? ये अल्ला ! अब मैं क्या करूं ? मुझे कौन बचाएगा ? मेरी सहायता कौन करेगा ? यह दुनियामें ऐसा कोई है जो मुझे बचावे ?

फत्तेखानाच्या मनात अनेक विचार आले. इतक्यात शिवाजी महाराजांचा त्याला निरोप आला. सगळे किल्ले दे– राज्य दे. तुला जीवदान देतो. माझ्या पदरी चाकरी देतो.

सिद्दीला उपाय सापडला. त्याने महाराजांना राज्य देऊन टाकण्याचा बेत केला; पण त्याच्या तीन क्रूर सेनानींनी त्याला विरोध केला. त्यांनी सुचविले, इंग्रजांची मदत घ्यावी. औरंगजेबाची मदत घ्यावी. आपले राज्य राखावे. जीवही वाचवावा.

फत्तेखानाने इंग्रजांना पत्र लिहिले– माझ्या मदतीला धावा. आम्हाला शिवाजीपासून वाचवा. पण इंग्रज मोठे धूर्त. त्यांना शिवाजीमहाराजांचा दणका ठाऊक होता. त्यांनी मदत नाकारली.



मग फत्तेखानाने औरंगजेबाच्या लोदीखान या सरदाराकडे मदत मागायचे ठरविले. पण लोदीखानाला निरोप पाठवायचा कसा ? आणि लोदीखान येणार कसा ? कारण मराठ्यांनी खानाला घेरून टाकले होते.

फत्तेखान विचार करीत होता आणि मराठे पुढे पुढे घुसत होते. त्याचा गळा आवळीत होते. मराठ्यांनी धडाका सुरू केला. गडामागे गड घेतले. तळे घेतले. राजपुरी घेतली. दंडागाव घेतले. दंडा किल्ला घेतला. खानाचे सात किल्ले घेतले. सगळा मुलूख घेतला. जमिनीवरचा एकही किल्ला फत्तेखानाकडे राहिला नाही.

दंडा किल्ल्यावरून फत्तेखान पळाला. जीव घेऊन पळाला आणि जंजिरा किल्ल्यात जाऊन लपून बसला.

महाराजांचा दणदणीत विजय झाला.

दंडा किल्ल्यावर मराठ्यांचे निशाण डौलाने फडकू लागले.



# ७. साल्हेरीचे रणमैदान

ही कथा आहे साल्हेरीच्या रणसंग्रामाची, औरंगजेबाच्या पराभवाची, महाराजांच्या प्रचंड सामर्थ्याची !

आता महाराजांचे बळ अतोनात वाढले होते. धरतीला नमविण्याची, महासागराला खेळविण्याची आणि आकाशाला लोळविण्याची महाराजांची ताकद होती.

त्याचे असे झाले.—

सहा-सात वर्षांपूर्वी औरंगजेबाने स्वराज्य बुडविण्याचा घाट घातला. मिर्झा राजे जयसिंग आणि दिलेरखान यांना महाराजांवर पाठविले. मोगल फौजेने महाराष्ट्रात हैदोस घातला. महाराजांनी तह करून तेवीस किल्ले आणि बराच मुलूख मोंगलांना दिला. पण औरंगजेबाने दगाबाजी करून महाराजांना आग्र्याला भेटीस बोलावून कैदेत टाकले. त्यांना ठार मारण्याचा बेत केला. पण महाराज युक्तीने मृत्यूच्या तावडीतून सुटले होते !

महाराज अत्यंत विचारी, संयमी. त्यांनी औरंगजेबाशी झालेला तह पाळला. आपला शब्द राखला. सलोखा चालू ठेवला; पण औरंगजेबाला आपल्या विशाल साम्राज्याची घमेंड होती. महासागरासारख्या फौजेची घमेंड होती. हिमालयासारख्या धनराशींची घमेंड होती. त्याने आपला शब्द मोडला. तह मोडला. सलोखा तोडून टाकला. त्याने महाराजांशी दगाबाजी केली. स्वराज्य बुडवायचा बेत केला. हिंदूंच्या छळाला सुरुवात केली !

आणि महाराज चिडले. संतापले. त्यांनी दगाबाज औरंगजेबाला धडा शिकवायचे ठरविले. जयसिंगाच्या स्वारीचा, दिलेरखानाच्या क्रौर्याचा आणि आग्र्यातील कैदेचा सूड घ्यायचा महाराजांनी निर्धार केला.

महाराजांनी आदेश दिला.

नौबत झडली. रणशिंग वाजले.

आणि प्रचंड रणघोष झाला– " हरहर महादेव ! "

मराठ्यांची रणगर्जना आकाशाला भिडली. महाराष्ट्रातील दरीखोरी दुमदुमली. कडेकपारी निनादल्या. गड नि गड उत्साहाने भरून गेला.

सुरुवात केली तानाजीराव मालुसऱ्यांनी. त्यांनी औरंजेबाकडून सिंहगड खेचून घेतला आणि मराठे मुलुखगिरीसाठी बाहेर पडले.

स्वतः महाराज, पेशवे मोरोपंत पिंगळे, सरसेनापती प्रतापराव गुजर आणि अनेक नामवंत मराठी योद्धे निघाले औरंगजेबाचा मुलूख लुटायला. गड जिंकायला. स्वराज्य वाढवायला !

आणि मग जे घडले ते भयंकर विलक्षण. अद्भुत. नवलपूर्ण. हत्तीच्या शक्तीने, वाघाच्या युक्तीने आणि सिंहाच्या छातीने मराठे मोगली मुलखावर तुटून पडले. त्यांनी मोगलाईत थैमान मांडले. मोगली मुलूख जाळीत, लुटीत, तुडवीत, बेचिराख करीत मराठे पुढे पुढे चालले.

मराठ्यांनी औरंगजेबाचे गडामागे गड घेतले. शहरामागे शहरे लुटली. गावामागे गाव घेतले. ठायी ठायी मोगल-सरदारांना

कुटून काढले. फौजेची कत्तल केली. मोगलाई हादरली. थरथरली. औरंगजेबाची झोप पार उडाली !

मग औरंगजेबाने काय केले ?

त्याने आपले समशेरबहाद्दर सुभेदार, सेनापती आणि सरदार निवडले. महाबतखान, बहादूरखान, दिलेरखान, दाऊदखान इख्लासखान, जसवंतसिंग– किती यादी द्यावी ! खुद्द औरंगजेबाचा मुलगा शहाजादा मुअज्जमही दक्षिणेत होता. प्रचंड संपत्ती, तोफखाना, दारूगोळा, शेकडो हत्ती, उंट, हजारो घोडे घेऊन मोगली सेनापती मराठ्यांना नष्ट करायला दक्षिणेत आले !

पण महाराजांनी सगळ्या खानांना सपाटून मार दिला. गडामागे गड जिंकले. साल्हेरीचा गड स्वतः जिंकला. साल्हेरीचा गड प्रचंड होता. मजबूत होता. तो गड महाराजांनी जिंकला. ही खबर ऐकून औरंगजेब आपल्या सरदारांवर चिडला. त्याने संतापाने विचारले, "शिवाजी तुम्हांला सारखा हरवतो आहे. तुम्हांला शरम कशी वाटत नाही ? ताबडतोब साल्हेरीचा किल्ला परत जिंकून घ्या !"

महाराजांनी साल्हेरीवर प्रचंड बंदोबस्त ठेवला व ते परतले.

औरंगजेबाचा आपल्या सरदारांना हुकूम आला त्या वेळी पावसाळा होता. पावसाळ्यात कोठला खान मरायला साल्हेरीवर येणार ? महाबतखान औरंगाबादला होता तो नर्तकींच्या नाच-गाण्यात रंगला होता. बहादूरखान सुरतेत होता. दिलेरखानही सुरतेत होता. इतर खान ठिकठिकाणी शामियान्यात ऊब घेत होते. खात होते. पीत होते. आरामात हुक्का ओढीत होते.


दिलेरखान मात्र वळवळत होता. पुरंदरवर मुरारबाजीने दिलेल्या तडाख्याचे वळ अजून त्याच्या पाठीवर होते. त्याचा महाराजांवर राग होता. फार राग होता. तो महाराजांशी अत्यंत वैर करी. त्याने बहादूरखानाबरोबर बसून योजना आखली–शिवाजीवर चौफेर चढाई करायची. गड जिंकून घ्यायचा. स्वराज्य नष्ट करायचे !

शेवटी महाराष्ट्रातला मुसळधार पाऊस संपला. हिवाळ्याचे दिवस सुरू झाले. उत्साहवर्धक हवा वाहू लागली. औरंगजेबाचे सेनापती आणि सरदार धुंद आरामातून जागे झाले. साल्हेरीचा गड सर करायच्या तयारीला लागले. मोगलांच्या छावण्याछावण्यात साल्हेरीला जाण्याची गडबड सुरू झाली. खानांचे तळ हालले. सगळे खान फौजेसह साल्हेरीची वाट चालू लागले.

हा हा म्हणता साल्हेरीचा गड वेढला गेला. औरंगजेबाचे पन्नास-साठ सरदार जमले. साठ हजार फौजेने गडाला विळखा घातला. शेकडो हत्ती, हजारो उंट आणि अगणित घोड्यांनी गडाचा परिसर गजबजून गेला. अक्राळविक्राळ तोफा गडाच्या दिशेने रोखल्या गेल्या.

साल्हेरी जिंकण्यासाठी औरंगजेबाने आपली सगळी शक्ती पणाला लावली होती. सारे युद्धसाहित्य रणक्षेत्रावर ओतले होते. वेढा जबरदस्त होता. मोगल एवढ्या संख्येने महाराजांसमोर कधीच उभे राहिले नव्हते. या वेळी त्यांनी महाराजांचा पराभव करायचा पणच केला होता !

गडावरील मराठी फौजेने मोगलांची अफाट फौज, अफाट रणसाहित्य आणि हजारो हत्ती-घोडे-उंट पाहिले. पण ते जराही



डगमगले नाहीत. मोगलांनी तोफा डागल्या. हल्ले केले. रणगर्जना केल्या. मराठ्यांनी तोफेला तोफेने उत्तर दिले. एक महिना गेला, दुसरा मागे पडला. तिसरा महिना आला. पण मराठ्यांनी वेढ्याला दाद दिली नाही.

कडक थंडी पडू लागली. मोगल गारठू लागले. वेढा उठवावा तर औरंगजेब रागावेल. चालू ठेवला तर शिवाजी लढायलाच येत नाही. आता काय करावे ?

शेवटी दिलेरखानाने नामी युक्ती शोधून काढली. इख्लासखानाकडे साल्हेर गड जिंकण्याची कामगिरी सोपवावी आणि स्वत: दिलेरखान, महाबतखान आणि बहादूरखान यांनी शिवाजीच्या स्वराज्यावर तडाखेबंद हल्ला करावा !

ठरले. सगळ्यांना पसंत पडले. औरंगजेबाचे तीन बलाढ्य सरदार स्वराज्यावर चालून निघाले. महाराजांचे दुसरे गड जिंकण्याच्या तयारीला लागले.

दिलेरखान मोठा जिद्दीचा. महाराजांचा महान वैरी. महाराजांचा नाश करण्यासाठी तो आसुसला होता. त्याने खळागडाला वेढा दिला. मराठ्यांनी त्याला हैराण केले. मग तो कणेरागडाकडे वळला. मराठ्यांनी त्याचे बाराशे पठाण एका दमात कापून काढले.

दिलेरखानाला अपयशामागे अपयश येऊ लागले. तो वैतागला. सरळ लढाईत मराठे आटोपत नाहीत काय ? ठीक आहे. त्या क्रूरकर्म्या खानाने नीच कर्म करायचे ठरविले.

दिलेरखान चाकणच्या दिशेने निघाला. त्याने चाकणचा किल्ला सर केला. आणखी काय केले ? चाकणमधील नऊ वर्षांवरील सगळ्या मुलांची कत्तल केली !

मग खान पुण्याकडे वळला. तेथील नऊ वर्षांवरील सगळ्या मुलांची त्याने सर्रास कत्तल केली ! दिलेरखान पुण्यातच तळ देऊन बसला. महाराजांनी पुण्याकडे यावे, साल्हेरीकडे जाऊ नये असा खानाचा डाव होता.

त्या वेळी महाराज काय करीत होते ?

साल्हेरीला वेढा पडताच महाराजांनी औरंगजेबाचा डाव ओळखला. ही अटीतटीची लढाई आहे, हे त्यांच्या लक्षात आले. नव्हे, साल्हेरीचा गड महाराजांनी स्वतः जिंकला होता, त्या वेळीच त्यांनी हेरले होते की औरंगजेब साल्हेरी परत जिंकण्याचा प्रयत्न करणार. म्हणून त्यांनी साल्हेरीवर मजबूत ठाणे ठेवले होते.

साल्हेरीला मोंगलांचा वेढा पडताच महाराज महाडला गेले होते. ते फौज जमा करीत होते – साल्हेरीच्या साहाय्यासाठी – स्वराज्याच्या रक्षणासाठी, शत्रूंना नामोहरण करण्यासाठी.

महाराजांनी निर्धार केला– औरंगजेबाचे आव्हान स्वीकारायचे. दिलेरखानाचा डाव त्याच्यावरच उलटवायचा. साल्हेरगड राखायचा! एवढेच नाही तर मोगलांना मैदानावरच्या लढाईत धूळ चारायची. मोगली फौज जमीनदोस्त करायची. सगळ्या खानांची धूळधाण करायची! समोरासमोर लढायची तुम्हांला गुर्मी आहे काय? साल्हेरीच्या मैदानावर गाठतो तुम्हांला. माझे मराठे आता आकाश लोळवतील. मग तुमची कथा काय?

महाराजांनी ताबडतोब मोरोपंत पेशवे आणि सरनौबत प्रतापराव गुजर यांना पत्रे लिहिली– ताबडतोब निघा. साल्हेरी गाठा. गडाच्या गळ्याला वेढ्याचा फास लागला आहे. शत्रूवर एका बाजूने मोरोपंतांनी हल्ला करावा. दुसऱ्या बाजूने सरनौबतांनी घोडे घालावेत. शत्रूला धुळीला मिळवा.

मोरोपंत आणि प्रतापराव त्वरेने निघाले. ठिकठिकाणाहून नामांकित मराठी सरदार त्यांना येऊन मिळाले. आनंदराव मकाजी, रूपाजी भोसले, शिदोजी निंबाळकर, सूर्यराव काकडे, व्यंकाजी दत्तो, विसाजी बल्लाळ, मुकुंद बल्लाळ, मानाजी मोरे, मोरो नागनाथ असे एकापेक्षा एक वरचढ वीर साल्हेरीच्या रणक्षेत्रावर जमा झाले. एकूण चाळीस हजार मराठी फौज औरंगजेबाच्या साठ हजार फौजेचा मुकाबला करायला आली.

गडाच्या पायथ्याला इख्लासखानाची फौज पसरली होती, पाच महिने वेढा घालूनही त्याला काडीमात्र यश लाभले नव्हते.

साल्हेरच्या प्रचंड गडावर मराठ्यांचे भगवे निशाण दिमाखाने फडकत होते. गडाच्या नगारखान्यात सांज-सकाळ नौबत झडत होती. मराठे वाघाच्या हिमतीने लढत होते.

गडावरच्या मराठी फौजेने गड सोडवायला आलेल्या मोंगल सैन्याला पाहिले आणि प्रचंड गर्जना केली– 'हर हर महादेव !'

तीन-चार कोसांच्या त्या अफाट रणक्षेत्रावर मोगल आणि मराठे अटीतटीने उभे राहिले होते. मोगलांना हवी असलेली लढाई खेळायला मराठे आले होते. समोरासमोरची मैदानी लढाई आज होणार होती. मराठे संख्येने कमी होते. मोगल अधिक होते. पण मराठ्यांनी आव्हान स्वीकारले होते. नव्हे मोगलांना आव्हान दिले होते – गनिमी काव्यानेच नव्हे मैदानी लढाईतही कमी संख्येने आम्ही तुमची धूळदाण उडवणार आहोत. मराठ्यांनी धोका पत्करला होता. पण दुबळ्यांना धोका वाटतो तो मर्दांना पराक्रमाचा मोका वाटतो. मोगल हत्तीसमोर मराठी वाघ जिद्दीने उभे होते. आज कसोटी होती – दोघांच्या शक्तीची, युक्तीची, हिमतीची ! आज कसोटी होती – औरंगजेबाच्या डावाची आणि महाराजांच्या प्रतिडावाची ! आज कसोटी होती युद्धनीतीत श्रेष्ठ कोण – जगातला बलाढ्य सम्राट औरंगजेब की सह्याद्रीचा राजा शिवाजी !

मराठ्यांची रणनौबत एकाएकी झडू लागली.

रणशिंग फुंकले गेले.

'हर हर महादेव !' आकाशभेदी गर्जना उठली.

मराठ्यांनी मोगलांवर चाल केली.

कोण जिंकणार आणि कोण हरणार हे कोणालाच ठाऊक नव्हते.

मराठ्यांनी मुसंडी मारली. वळणे घेतली आणि चित्त्याच्या चपळाईने त्यांनी मोगलावर हल्ला केला.

मोगलांचा प्रचंड तोफखाना धडाडू लागला. धाड धाड गोळे सुटले. उंटावरल्या छोट्या तोफा कडकडू लागल्या. मोगलांनी मराठ्यांवर आग ओकली. बाणांचा पाऊस पाडला.

मराठ्यांना आज अपूर्व अवसान चढले होते. त्यांच्या अंगात रक्त उसळले होते. त्यांच्या छात्या टरटरा फुगल्या होत्या. बाहू स्फुरण पावत होते. मुठी शिवशिवत होत्या. कशासाठी ? शत्रूला समोरासमोर गाठण्यासाठी. शत्रूला भिडण्यासाठी. शत्रूचे चूर्ण चूर्ण करण्यासाठी !

मराठे आग गिळीत पुढे पुढे निघाले.

आणि आकाशभेदी रणगर्जना उठली–

हर हर महादेव !

आणि मोरोपंतांनी आपले पायदळ एका बाजूने मोगली फौजेत घुसवले. दुसऱ्या बाजूने प्रतापरावाचे घोडदळ घुसले– मराठ्यांनी मोगली फौजेला भगदाडे पाडली.

साल्हेरचे रणकुंड धडधडले. कडकडले. पेटले. तोफा पुन्हा पुन्हा धडाडल्या बंदुका कडाडल्या. तीर सणसणले.

मराठे मोगलांना मागे रेटू लागले. मोगलांनी मराठ्यांवर हत्ती सोडले. घोडेस्वार घातले. मराठे बेभान झाले. त्यांच्या हातातले दुधारी पट्टे विजेसारखे तळपू लागले. तलवारी लकलकू लागल्या. भाले कचकचू लागले. खचकन शत्रूच्या छाताडात घुसू लागले.

साल्हेरच्या रणांगणावर एकच गर्दी उसळली. रणधुमाळी माजली. हलकल्लोळ उडाला. जखमी हत्ती चीत्कार करीत उलटे

फिरून धावू लागले. त्यांच्या पायाखाली मोगल चिरडले जाऊ लागले. जखमी घोडे मरणांतिक खिकाळू लागले. कोसळू लागले. जखमी सैनिक किंकाळू लागले.

साल्हेरच्या रणक्षेत्रावर पावसाच्या सरीसारख्या रक्ताच्या धारा वाहू लागल्या. रक्ताचे पाट वाहू लागले. हजारो सैनिक, उंट, घोडे आणि हत्ती मरून पडले. मांसाचा चिखल झाला. त्यात लढवय्यांचे पाय रुतू लागले.

बारा तास युद्ध चालले. मोगल आणि मराठ्यांचे दहा हजार सैनिक ठार झाले. मोगलांची फार हानी झाली. त्यांचे अनेक सरदार ठार झाले. असंख्य जखमी झाले. मराठ्यांचा एक सरदार ठार झाला. नामांकित योद्धा, महाराजांचा बालमित्र- सूर्यराव काकडे !

मैदानी लढाईत मराठ्यांना प्रचंड विजय मिळाला. मोग-लांचा पूर्ण मोड झाला. इख्लासखनाचा पुरा पराभव झाला. मराठ्यांनी मोगलांचा तळ जाळून, पोळून, मोडून नष्ट केला.

मराठ्यांना प्रचंड लूट मिळाली. सव्वाशे हत्ती, सहा हजार घोडे, सहा हजार उंट, मालमत्ता, कापड, खजिना आणि जडजवाहीर अगणित– अमाप. विपुल !

दिलेरखान कोठे होता त्या वेळी ? त्याला पुण्याहून निघावेच लागले. मोगलांच्या मदतीसाठी त्याने पुणे सोडले आणि तो साल्हेरीकडे निघाला होता. पण साल्हेरीपासून चार मैलांवर असतानाच मोगलांच्या पराभवाची खबर त्याला मिळाली. तो आला तसाच मागच्या मागे पळून गेला !

मोरोपंत आणि प्रतापराव यांनी टाकोटाक महाराजांकडे जासूद रवाना केले. महाराजांना विजयाची खूष खबर कळली. त्यांना अत्यानंद झाला. त्यांनी जासुदाच्या हातांत सोन्याची कडी घातली. हत्तीवरून साखरा वाटल्या. गडागडावरून विजयाच्या तोफा सोडल्या. मोरोपंत, प्रतापराव, सरदार आणि सैनिक यांच्यावर बक्षिसांचा पाऊस पाडला.

औरंगजेबाचा न भूतो न भविष्यति असा पराभव झाला होता.

महाराजांच्या आनंदाला सीमा राहिली नाही.



# ८. कोळीराजांची पळापळ

साल्हेरीच्या विजयाने महाराज मनोमनी आनंदले होते.

महाराजांच्या प्रतापाने औरंगजेबाचे तोंड काळे ठिक्कर पडले. त्याचे सेनापती शरमले. सम्राटाचा अहंकार जमीनदोस्त झाला. त्याच्या सरदारांची घमेंड पार उतरली. उद्धट आकाश वरमले. लवले. नमले. महाराष्ट्राची धरती मोहरली. बहरली. आनंदाने पुलकित झाली. कारण सारे काही अद्‌भुत घडले होते. ' चुव्वा ' ' शेर ' झाला होता. उंदीर अचाट शक्तीचा वाघ बनला होता मराठे जगाला भारी झाले होते !

महाराज जिजाऊ आईसाहेबांच्या दर्शनाला गेले. त्यांनी आईसाहेबांची पावले दोन्ही हातांनी कवळली आणि त्यावर आपला माथा टेकला.

" शिवबा, आयुष्यमान भव ! "

आईसाहेब गहिवरल्या. आनंदाने ओल्या चिंब झाल्या. त्यांच्या नेत्रांची निरांजने लखलखली !

महाराज मोठ्या अदबीने आईसाहेबांसमोर बसले. त्यांच्या चेहऱ्यावर सहस्र चंद्रांचे चांदणे झळकत होते. डोळ्यांत भक्ति-भावांचे सागर साठले होते. मातृदर्शनाने त्यांचे देखणे रूप अधिक सौजन्यशील दिसत होते.

" शिवबा, तुझा प्रताप ऐकून धन्यता वाटली. "

" मासाहेब, हा आपल्याच शिकवणीचा प्रताप आहे. "

आईसाहेब अधिकच गहिवरल्या. काही क्षण त्यांनी डोळे मिटून घेतले. जणू काय त्या आपल्या मनाचा ठाव घेत होत्या.

" राजे !" सद्‌गदित अंतःकरणाने आईसाहेब म्हणाल्या, " या क्षणी सगळा भूतकाळ माझ्या मनात गर्दी करून उभा आहे. सुलतानांच्या अत्याचारानं ओस पडलेले गाव, फुटलेली देवळं, तुटलेले देव मला आताही दिसताहेत. जुलूमशहांच्या क्रौर्यानं भयभीत झालेल्या स्त्रीपुरुषांची दीनवाणी रूपं मनासमोर उभी राहाताहेत. बलात्कारित तरुण मुलींचे हंबरडे कानांवर आदळताहेत. महाबतखानानं गोदावरी नदीत स्नान करताना पळवून नेलेल्या माझ्या जावेच्या किंकाळ्या मला आजही ऐकू येताहेत....निजामशहानं भर-दरबारात कपटानं खून केलेले माझे वडील आणि भाऊ यांच्या आठवणी मला व्याकुळ करताहेत. अफझलखानानं माझ्या संभाजीचा कपटानं केलेला वध, त्यानंच थोरल्या राजांना कैद करून माझ्या सौभाग्यावर घातलेला घाला– हे प्रसंग आजही माझ्या काळजाचं पाणी पाणी करताहेत !"

आईसाहेबांच्या डोळ्यांना अश्रूंच्या धारा लागल्या.

महाराजही सद्‌गदित झाले.

" राजे !" आईसाहेब पुढे म्हणाल्या, " ते क्रूर सैतान बालपणी तुमच्या जिवावर उठले होते मोगलांचा सरदार म्हालदारखान यानं तुम्हांला पकडायला आकाश–पाताळ एक केलं. तुम्ही तीन वर्षांचे असताना तुम्हांला खेडेबारे गावात लपवून ठेवलं आणि मी त्याच्या कैदेत राहिले....राजे, आज हे सगळं आठवतं. काळीज फाटतं. काय भयंकर काळ होता !"

आईसाहेब पराकाष्ठेच्या गंभीर झाल्या. "राजे, असं वाटतं– मी स्वप्नात तर नाही ना ?....न संपणारा काळोख संपला, दैन्यावस्था दूर झाली. तरुण मुली निर्भयपणं फिरू लागल्या. गावं गजबजली. देवळात भक्तांची दाटी झाली. दुष्टांचा नाश झाला. सज्जनांचं रक्षण झालं. नद्यांतलं पाणी उदंड झालं. सुकाळ आला. नवा काळ आला. नवं युग आलं. रामराज्य आलं. .... आणि .... आणि .... माझ्या राजा, हे सगळं तू केलंस ! माझी आस पूर्ण झाली. माझी कूस धन्य झाली. शिवबा, भोसले कूळ अमर झालं !"

खूप वेळ बोलणी चालू होती. मग महाराज आईसाहेबांना मुजरा करून निघून गेले.

तो सबंध दिवस महाराजांना आईसाहेबांचा सुख:दुखाने भारावलेला चेहरा दिसत होता. मग त्यांनाही भूतकाळ आठवला. लहानपणी आईसाहेबांनी वीरांच्या शौर्यकथा सांगून आपलं मन कसं घडविलं, स्वातंत्र्यप्रेमाने आपण कसे धगधगलो, मावळा-मावळात हिंडून मावळे कसे जमा केले आणि रायरेश्वरापुढे स्वराज्याची शपथ कशी घेतली हे सगळं त्यांना आठवलं.

महाराजांना जिवाला जीव देणारे साथीदार आठवले. जिवावरचे प्रसंग आठवले. स्वराज्यावरची संकटे आठवली !

आणि महाराजांना हेही आठवले की सुरुवातीला सगळ्यांनीच स्वराज्याला विरोध केला. हे विरोधक कोण होते ? मोगल, पठाण, सुलतान हे परके लोक तर होतेच. पण देशमुख, देशपांडे, जहागिरदार आणि मराठी राजे हे आपले देशबांधवही होते. खुद्द आपला सावत्र मामा, सख्खा मेहुणा आणि कित्येक नातेवाईकही आपले विरोधक होते. स्वराज्य व्हावे यासाठी आपल्याला या सगळ्यांचे पारिपत्य करावे लागले !

आजही स्वराज्याला विरोध करणारे राजे आहेतच. आणि महाराजांना विक्रमशहा, सोमशहा आणि धाराराय कोळी हे कोळी राजे आठवले. त्यांचे परिपत्य करण्याचा त्यांनी बेत केला.

महाराजांनी मोरोपंत पेशव्यांना ताबडतोब आपला बेत कळविला.

त्या वेळी मोरोपंत मुल्हेरगडावर होते.

वैशाख महिन्याचे दिवस होते. कडक उन्हाळा पडला होता. दहापंधरा दिवसांत पावसाळा सुरू होईल असे दिसत होते. पावसाला सुरुवात होण्यापूर्वी राजधानीत परतावे असा मोरोपंतांचा बेत होता. इतक्यात महाराजांचा जासूद येऊन पोचला. महाराजांचे पत्र वाचून मोरोपंतांनी आपला बेत बदलला.

मोरोपंत फौज घेऊन मुलुखगिरीवर निघाले. मराठे सुरतेच्या रोखाने निघाले.

एक दिवस आकाशात ढग जमू लागले. थंड थंड वारे वाहू लागले. पावसाळा सुरू होण्याची चिन्हे दिसू लागली. पण मोरोपंत सुरतेच्या दिशेनेच चालले होते.

आणि खरोखरच पावसाळा सुरू झाला. एक जोराची सर येऊन गेली. तापलेली धरती भिजून ओलीचिंब झाली. पहिल्या पावसानंतर नेहमीप्रमाणे मातीचा धुंद सुवास हवेत दरवळला. मराठी फौज उल्हसित झाली. ओलीचिंब जंगले तुडवीत मराठे मजल दरमजल करीत पुढे निघाले.

मोरोपंत जव्हारवर स्वारी करायला निघाले होते.

जव्हार हे एक छोटे कोळी राज्य होते ते सुरतेच्या अलिकडे शंभर मैलांवर होते. जव्हारला विक्रमशहा हा कोळी

राजा होता. तो मोगलांना सामील होता. विक्रमशहा महाराजांचा शत्रू होता. आजपर्यंत महाराजांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केले होते. पण असा शत्रू आपल्या राज्याला लागून असणे धोक्याचे होते.

जव्हार म्हणजे जंगलातले राज्य होते. तेथे बेसुमार पाऊस पडे. या वेळी तेथे पावसाला नुकतीच सुरुवात झाली होती. मोरोपंतांनी तीच वेळ साधली. मराठी फौजेने पावसातच जव्हारवर झेप घेतली. मराठ्यांची झेप म्हणजे ढाण्या वाघाची झेप. एका झडपेत विक्रमशहाचा निकाल लागला.

विक्रमशहा जीव घेऊन पळत सुटला. तो मोगलांना जाऊन मिळाला. त्यांच्या आश्रयाला राहिला. सतरा लाखांचा त्याचा खजिना मराठ्यांना मिळाला.

रिमझिम पाऊस पडतच होता. मोरोपंतांनी जव्हारला विजयोत्सव साजरा केला आणि ते पुढे निघाले.

पुढली झेप होती रामनगरवर. रामनगर जव्हार व सुरत यांच्या मध्ये सुरतेपासून अलिकडे साठ मैलांवर होते; तेथेही कोळी राजा होता त्याचे नाव सोमशहा. विक्रमशहाप्रमाणे हाही मोगलांना सामील होता. तोहि महाराजांशी वैर करीत असे.

मराठी फौज येत आहे ही खबर सुरतेपर्यंत पसरली. सगळीकडे घबराट पसरली. लोक पळू लागले. गणदेवी ओस पडली. रामनगरमध्ये भयंकर घबराट पसरली. सोमशहा घाबरला. बायकोमुलांना घेऊन तो पळाला. तो चिकलीगावी जाऊन राहिला.

मोरोपंत रामगनरला पोचले. इतक्यात बातमी आली की दिलेरखान लढाईची तयारी करून येत आहे.

मोरोपंत सावध झाले. त्यांनी दिलेरखानाची गंमत करायचे

ठरविले. ते रामनगरपासून काही अंतर मागें हटले. नवीन फौज उभी केली.

आता मुसळधार पाऊस पडू लागला होता. रामनगरच्या जंगलात झंझावात सुटला होता. जंगले रोरावत होती. नदीनाल्यांना पूर आले होते.

आणि एके दिवशी मुसळधार पावसात मोरोपंतांच्या पंधरा हजार फौजेने रामनगरवर मुसंडी मारली. सोमशहाला ही खबर लागताच तो चिकलीहून पळत सुटला-बायको-मुले घेऊन पळत सुटला.

पण सोमशहा जाणार कोठे ? दिलेरखानाकडे जावे तर त्याचा ठावठिकाणा माहीत नव्हता. दिल्लीला जावे तर या मुसळधार पावसात जाणार कसे ? आणि अर्ध्या वाटेत मराठ्यांनी गाठले तर ?


सोमशहाने देवाचे नाव घेतले आणि तो दमणची वाट चालू लागला. त्या वेळी दमण पोर्तुगिजांच्या ताब्यात होते. सोमशहाने दमण गाठले. त्याने पोर्तुगिजांचा आश्रय मागितला. त्यांनी तो दिला.

मराठ्यांनी सोमशहाला सोडले; पण पोर्तुगिजांकडे खंडणी मागितली. त्यांनी ती कबूल केली.

सोमशहा पोर्तुगिजांच्या आश्रयाला राहून शेवटचे दिवस कंठू लागला. पण विक्रमशहा स्वस्थ बसला नाही. तो नाशिक जिल्ह्यात मोगलांच्या आश्रयाला होता. त्याने एक शस्त्रधारी टोळी तयार केली आणि ठाणे जिल्ह्यातील मराठी मुलखावर हल्ले करू लागला. शेतकऱ्यांना लुटू लागलाः दळणवळण बंद पाडू लागला.

विक्रमशहाच्या मुलाने बापाच्या सवाई पराक्रम करायला सुरुवात केली. त्याने आणि धारा राय कोळी या दुसऱ्या पदच्युत कोळी राजाने दरोडेखोरांची एक टोळी निर्माण केली. या टोळीने मराठी मुलखाला उपद्रव द्यायला सुरुवात केली. ते दोघे मराठी मुलखात राजरोस दरोडे घालू लागले. मराठी फौजेची लहानशी तुकडी गाठून तिच्यावर हल्ला करू लागले. मराठी फौजेचे दळण-वळण तोडू लागले.

शेवटी मराठी फौजेने त्या दोघांना एके दिवशी पकडले. त्यांचा शिरच्छेद केला आणि त्यांच्या दरोडेखोर टोळीचा सर्व-नाश केला.



# १. कोप्पळचा कैवारी

राज्यभिषेकानंतर सुमारे दोन वर्षांनी महाराज दक्षिणदिग्विजयाला निघाले. थाटामाटाने, डामडौलाने, राजेशाही वैभवाने. ही स्वारी कशासाठी होती ? स्वराज्य पूर्व समुद्रापर्यंत वाढविण्यासाठी. दक्षिणेतील क्रूर पठाणांचा पराभव करण्यासाठी. दक्षिणेतील हिन्दू-मुसलमान राजांची एकी करण्यासाठी आणि शेवटी सर्वांनी मिळून औरंगजेबाचे साम्राज्य धुळीला मिळविण्यासाठी.

महाराजांची स्वारी मजल दरमजल करीत पुढे पुढे चालली होती. ते गोवळकोंड्याच्या कुतुबशहा बादशहाला भेटायला निघाले होते. त्याने आग्रहाने महाराजांना भेटायला बोलविले होते. भागानगर ही कुतुबशहाची राजधानी. महाराज भागानगरच्या वाटेवर होते.

आणि एक दिवस कोणाच्याही ध्यानीमनी नसलेली गोष्ट घडली. महाराजांना एक करुण कहाणी ऐकू आली. एक आर्त हाक ऐकू आली. हजारो निरपराध माणसांच्या किंकाळ्या ऐकू आल्या. त्यांनी केलेला धावा ऐकू आला. महाराजांना त्यांची दया आली. त्यांनी त्यांना भेटण्याची परवानगी दिली.

त्या किंकाळ्या होत्या कोप्पळ परगण्यातल्या हिंदूंच्या. कोप्पळ हा कानडी मुलूख. तेथे विजापूरच्या बादशहाचे ठाणे होते. कोप्पळला एक किल्ला होता. किल्ला मजबूत होता. कोप्पळच्या

ठाण्यावर विजापूरचे दोन सरदार होते. दोघे भाऊ होते, एक हुसेन-खान मियाना आणि दुसरा अब्दुर्रहीमखान मियाना. सैताना-पेक्षाही ते क्रूर होते. लोक त्यांना राक्षसच म्हणत. अहीमही रावणच होते म्हणा ना !


दोघेही भाऊ प्रजेवर जुलूम करीत होते. हिंदूंना जीव नकोसा झाला होता. स्त्रिया हैराण झाल्या होत्या. मुले भयग्रस्त झाली होती. गुरेवासरे भीतीने हंबरत होती. दिवसामागे दिवस जात होता. पण त्यांची मुक्तता होण्याचा दिवस उगवत नव्हता. कोप्प-ळची जनता नरकयातना भोगीत होती. पण त्यांना कोणी वाली नव्हता. त्यांनी परमेश्वराला आळवले. त्याची प्रार्थना केली. त्याचा धावा केला. पण परमेश्वर पावला नाही. धावून अला नाही; पण नाही तरी कसे म्हणावे ? कोप्पळच्या कानडी लोकांना कळले की शिवाजी महाराज भागानगरला जात आहेत. त्यांना वाटले, देव पावला. आपल्या हाकेला देवच धावून आला. त्यांना धीर आला. अत्यानंद झाला. त्यांना वाटले—महाराजांनी मराठी माणसांना गुलामगिरीतून सोडविले. ते आपल्यालाही सोडवितील. काही लोक गुपचूप कोप्पळमधून बाहेर पडले आणि महाराजां-कडे धावले.

माघ महिन्याचे दिवस होते. हवा आल्हाददायक होती. महाराजांच्या छावणीत उत्साहाला उधाण आले होते. प्रत्येक सैनिक चैतन्याने रसरसला होता. चिंतेचा काळ संपला होता. उमेदीचे दिवस आले होते. मराठे मुक्त मनाने छावणीत वावरत होते.

महाराज आपल्या वैभवशाली शामियान्यात आपल्या सर-दारांशी राजकारण करीत बसले होते. इतक्यात कोप्पळच्या

लोकांचे पुढारी महाराजांना भेटायला आले. भेटीची परवानगी मिळाली. कानडी मंडळींना महाराजांसमोर नेण्यात आले.

महाराजांच्या दर्शनाने कानडी मंडळी आनंदली. त्यांनी मुजरे केले. दंडवत घातले. उभे राहून हात जोडले. अत्यानंदाने त्यांचे डोळे डबडबले होते. त्यांनी महाराजांकडे पाहिले. ते सतेज



रूप पाहून कानडी मंडळी थक्क झाली. त्यांची नजर महाराजांच्या चरणाकडे वळली. त्या समर्थ चरणांना मिठी मारून हंबरडा फोडावा, आसवांनी राजांचे चरण धुवावे, दयेची भीक मागावी असे त्यांना वाटले. त्यांनी नजर वर करून पुन्हा महाराजांकडे पाहिले. महाराजांच्या नेत्रातून वात्सल्याचे चांदणे झिरपत होते.

ती कानडी माणसे साधीसुधी नव्हती. ते विद्वान होते. पंडित होते. ज्ञानवंत होते. महाराजांच्या दयार्द्र दृष्टीने ते भारावून गेले होते. त्यांच्यापैकी एक पंडित महाराजांना म्हणाला,

"महाराजांची कीर्ती आम्ही कधीपासून ऐकत होतो. आज हे दिव्य दर्शन झालं. आम्ही धन्य झालो."

महाराजांचे ओठ किंचित विलग झाले. त्यांच्या चेहऱ्यावरील स्मित पाहून पंडितांना धीर आला. पंडित पुढे बोलू लागला, "आम्ही घरून निघालो. वाटेत आम्हांला बातमी लागली आहे की त्या जुलूमशहांनी आमच्या घरी आपले क्रूर सैनिक पाठऊन आमच्या बायका-मुलांचा छळ चालविला आहे. आम्हाला ती जिवंत भेटतात की त्यांची प्रेतं आम्हाला पाहावी लागतात, हे परमेश्वराच ठाऊक !"

आपल्या बायकामुलांच्या आठवणींनी पंडित सद्गदित झाले.

"महाज !" तो पंडित म्हणाला, "मराठी मुलखात आपण न्यायाचे राज्य स्थापलंत. प्रजा सुखी झाली; रामराज्यात नांदू लागली. आम्ही कोप्पळ परगण्यातले लोक रावणाच्या राज्यात राहात आहोत. आणि एकाचा नाही, दोन रावणांचा जुलूम आम्ही सोशीत आहोत. महाराज, आता छळ सोसवत नाही. आम्हाला वाचवा, आम्हांला सोडवा !"

आणि मग पंडिताने मियाना बंधूंच्या क्रौर्याचे वर्णन केले. एकामागे एक करुण कहाणी सांगितली.

महाराज संतप्त झाले. त्यांच्या चेहऱ्यावरील चंद्राचे शीतल चांदणे मावळले. चेहरा लालेलाल झाला डोळे लालभडक झाले.

त्यांच्या डोळ्यांतून आगीचा लोळ बाहेर पडत आहे, असा भास झाला.

महाराजांनी आपले सरसेनापती हंबीरराव मोहिते यांना कोप्पळवर स्वारी करण्याचा आदेश दिला.

मराठे कोप्पळच्या रोखाने निघाले-अन्यायाला ठेचून काढण्यासाठी. पठाणांचे निर्दालन करण्यासाठी. दुष्टांच्या जुलमातून कोप्पळच्या जनतेला सोडविण्यासाठी.

शिवाजी महाराज अन्यायाचे वैरी होते. जनतेचे कैवारी होते. अन्यायाला विरोध करा, त्याची पाळेमुळे खणून काढा, ही त्यांची मराठ्यांना शिकवण होती. कोठे महाराष्ट्र आणि कोठे कोप्पळ ? पण आपल्या माणसांना सोडून कानडी माणसांना वाचवायला मराठे निघाले होते. आपली घरेदारे सोडून कोप्पळच्या जनतेची घरेदारे राखायला ते निघाले होते. आपले संसार महाराष्ट्रात टाकून दुसऱ्यांचे संसार सुखी करायला मराठे निघाले होते !

हंबीरराव मोहित्यांबरोबर फक्त दीड हजार फौज होती. पण ती कसलेली होती. त्यात बाजी सर्जेरावासारखे अनुभवी सरदार होते, तसेच धनाजी जाधव आणि नागोजी जेधे यांच्यासारखी तरुण मुले होती. ही तरुण मुले आपले भवितव्य घडवायला निघाली होती. नागोजी जेधे हा बाजी सर्जेरावाचा मुलगा आणि कान्होजी जेध्यांचा नातू. कान्होजी जेधे म्हणजे महाराजांचा उजवा हात. अफझलखान महाराजांना मारायला आला तेव्हा कान्होजी जेधे शिवरायांच्या साहाय्याला धावून आले होते आणि बाजी सर्जेरावाने आपल्या पोरवयात खळदबेलसरवर समशेर गाजविली होती. असे हे बापलेक सह्याद्रीतले वाघ होते. वाघांच्या वंशात

जन्मलेला नागोजी जेधे मराठ्यांच्या सरसेनापतीबरोबर कोप्पळ-वर निघाला होता.

हुसेनखान आणि अब्दुर्रहीमखान यांना खबर लागली. मराठ्यांची फौज लहान आहे, हेही त्यांना कळले. त्यांनी प्रचंड फौज जमा केली. मराठ्यांशी सामना द्यायला ते मोठ्या घमेंडीने उभे राहिले. दुष्ट हे सापासारखे असतात. त्यांना आपलीच बाजू बरोबर वाटते. ते जिवंत असेपर्यंत घमेंडीतच राहतात. सापांना नष्ट केल्याशिवाय त्यांचे विष नष्ट होत नाही आणि जुलूमशहांना नष्ट केल्याशिवाय त्यांची जुलूमशाही नष्ट होत नाही. मराठे पठाणांची जुलूमशाही नष्ट करायला निघाले होते.

मियानाबंधू मोठे डोकेबाज. त्यांनी मराठ्यांवर अचानक हल्ला करावा व त्यांची कत्तल करावी असा बेत आखला. त्यांच्या प्रचंड फौजेला ते सहज शक्य होते. आपली प्रचंड फौज घेऊन ते पठाण चोरपावलांनी मराठ्यांवर निघाले.

मराठे कोप्पळच्या वाटेवर होते. ते येलबुर्गा या गावात तळ देऊन होते. पठाण आपल्यावर चालून येतील याची हंबीरराव मोहित्यांना कल्पना नव्हती.

इतक्यात येलबुर्ग्याच्या सीमेवर धुळीचे लोटच लोट उसळलेले मराठ्यांना दिसले. हळूहळू ते धुळीचे लोट जवळ येऊ लागले. थोड्या वेळाने असंख्य घोडेस्वार दिसू लागले. ते घोडेस्वार जीव तोडून मराठ्यांच्या तळाकडे धावत होते.

थोड्या वेळाने 'दीन दीन' च्या आरोळ्या ऐकू येऊ लागल्या. तुफान वेगाने पठाणांची फौज मराठ्यांच्या दिशेने दौडत होती.

पठाणांच्या फौजेचे दृश्य भयंकर होते. या टोकापासून त्या टोकापर्यंत फौज पसरली होती. वादळी सागरासारखी ती प्रचंड फौज मराठ्यांना गिळायला येत होती. पठाण मदोन्मत्त होऊन दौडत होते. रोरावत आणि घोंगावत फौजेचा तो महासागर मराठ्यांना बुडवायला निघाला होता. प्रत्येक पठाण मस्तीने झिंगला होता.

फौजेचे ते अक्राळविक्राळ स्वरूप पाहूनच लेचीपेची फौज गर्भगळित झाली असती. पठाणांना वाटले होते–आपण मराठ्यांचा चट्टामटटा करून टाकू. पण घडले भलतेच. पठाणांची फौज जवळ येण्यापूर्वीच मराठे निघाले. धावले. पठाणांवर विजेसारखे कोसळले !

" हर हर महादेव !" मराठ्यांनी रणगर्जना केली.

त्या गर्जनेत भयंकर आवेश होता. पठाण थरकले. थबकले.

सरसेनापती हंबीरराव मोहित्यांनी लढण्याचा आदेश दिला. मराठी समशेरींची पाती सरकन म्यानातून बाहेर आली. लखलखली. भाले चकचकले. पुन्हा आरोळी उठली, " हर हर महादेव ! "

दीड हजार मराठी फौज हजारो पठाणांवर चवताळून धावली. तुटून पडली. मराठी तलवारी पठाणांच्या खांद्यावर प्रचंडाघात करू लागल्या. भाले छाताडात आरपार घुसू लागले. पठाणांची मुंडकी आकाशात उडू लागली. मराठे पठाणांची बेसुमार कत्तल करू लागले. मराठे पठाणी बोकड कापीत सुटले. " तोबा ! तोबा ! या अल्ला ! यह क्या हुआ ? " मियाना बंधूंना अल्ला आठवला !

पण आता उशीर झाला होता. जीव वाचविण्याची वेळ

निघून गेली होती. मराठ्यांनी पठाणी फौजेची फळी फोडली होती. तिला खिंडार पाडले होते. मराठे पठाणी फौजेत घुसून कापाकापी करीत सुटले.

हुसेनखान मियाना हत्तीवर बसून लढत होता. आपल्या फौजेची वाताहात पाहून त्या धिप्पाड, ताकदवान, कुर्रेबाज पठाणाचा धीर सुटला. माहुताने त्याचा हत्ती बाहेर काढला. हुसेन-खान पळू लागला.

खान पळत आहे, हे तरुण नागोजी जेध्याने पाहिले. तो चवताळून धावला. त्याने आपला घोडा खानाच्या हत्तीवर घातला. हातातला भाला त्याने खचकन् खानावर फेकला.

पण घात झाला.

खानाने नेम धरून नागोजीवर बाण सोडला. खानाचा बाण नागोजीच्या मस्तकात घुसला !

खान पुन्हा पळू लागला. हंबीररावाने पाहिले. धनाजी जाधवाने पाहिले. दोघेही खानावर तुटून पडले. खानाला कैद केले.

पठाणांचा पराभव झाला. हजारो पठाण ठार झाले. असंख्य जखमी झाले. बाकीची पठाणी फौज जीव वाचविण्यासाठी पळू लागली.

मराठ्यांना मोठी लूट मिळाली. दोन हजार घोडे, काही हत्ती आणि अपार संपत्ती !

पण नागोजीचा घात झाला. रोहिडखोऱ्यातला तो शूर तरुण कोप्पळच्या रणांगणावर पडला. त्याची तरुण बायको सती गेली. बाजी सर्जेरावाला पुत्र-निधनाने अपार दु:ख झाले.



कोठे रोहिडखोरे आणि कोठे कोप्पळ ! पण त्या काळचे मराठे हे असे होते. दुसऱ्यावरील अन्याय पाहून ते जुलूमशहावर तुटून पडले. दुसऱ्यांचे संसार राखण्यासाठी त्यांनी आपले संसार बुडविले. दुसऱ्यांना जगविण्यासाठी त्यांनी मरणाला स्वखुशीने कवटाळले. पराक्रम म्हणतात तो हाच ! माणुसकी म्हणतात ती हीच. मराठ्यांची दानत अशी होती !

कोप्पळचे लोक मुक्त झाले.

हंबीरराव मोहिते फौजेसह येऊन महाराजांना मिळाले. नागोजीच्या मरणाने महाराज दुःखी झाले. महाराज भागानगरची वाट चालू लागले.

# १० खांदेरीचे सागरी युद्ध

शिवाजी महाराजांसारखा दूरदृष्टीचा दुसरा राजा जगात झालाच नाही.

महाराजांच्या जन्मापूर्वीच इंग्रज लोक भारतात आले होते. त्यांनी मोगल बादशहाकडे व्यापाराच्या सवलती मागितल्या. त्यांनी त्या दिल्या. मग इंग्रजांनी ठिकठिकाणी वखारी घातल्या. ते व्यापार करू लागले. ते वरवर व्यापार करीत होते; पण या देशात आपले राज्य स्थापायचे बेत ते आखीत होते. त्यांचे हे बेत मोगलांना कळले नाहीत. विजापूरच्या सुलतानांना कळले नाहीत. गोवळकोंडयाच्या सुलतानांना कळले नाहीत.

महाराजांनी मात्र इंग्रजांचा डाव ओळखला.

इंग्रजांनीही ओळखले की आपण बादशहाला फसवू. सुलतानांना फसवूं. पण शिवाजीला फसविणे कधीही शक्य नाही. मग इंग्रजांनी काय केले ? ते महाराजांच्या शत्रुंना सामील झाले. त्यांनी त्यांना तोफा दिल्या. महाराजांवर तोफा डागल्या. इंग्रज महाराजांच्या जिवावर उठले. महाराज म्हणजे धगधगती आग. ते संतापले. त्यांनी इंग्रजांची पाळेमुळे खणून काढायचे ठरविले. महाराजांनी इंग्रजांची राजापूरची वखार खणून काढली. काही इंग्रजांना कैदेत डांबून ठेवले. संधी मिळाली तेव्हा तेव्हा इंग्रजांना झोडून काढले.

इंग्रजांचे डोळे खाडकन् उघडले. त्यांनी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी महाराजांशी तह केला ! महाराजांनी

म्हटले–ठीक आहे. पाहू तर इंग्रजांची कसोटी ! महाराजांनी इंग्रजाकडे दारूगोळा मागितला. त्यांनी तो चक्क नाकारला.

महाराजांची खात्री झाली–इंग्रज लबाड आहे. बिलंदर आहे. धूर्त आहे. त्यांना आपले आरमार, तोफा, दारुगोळा यांची घमेंड आहे. ठीक. या इंग्रजाला धडा शिकवायलाच पाहिजे. जशास तसेच वागले पाहिजे. महाराजांनी धरणगावावर स्वारी केली. इंग्रजांचा माल लुटला.

महाराजांचा अंदाज खरा होता. इंग्रजांना आपल्या आरमाराची घमेंड होती. आपण समुद्राचे राजे आहोत. आपण सागरपुत्र आहोत. भारतातल्या कोठल्या राजाकडे आरमार आहे ? मोगल सम्राटाकडे आरमार नाही. सुलतानाकडे आरमार नाही. शिवाजी तर कालचा राजा– त्याचे आरमार कसले ? त्याची काय हिंमत आपल्याशी समुद्रावर लढाई करण्याची ? तो आपल्या लुटीची भरपाई करीत नाही काय ? ठीक– त्याच्या दाभोळ, चौल, कल्याण बंदरावर धाड घालू. शिवाजीची गलबते पकडून ठेवू ! मग येईलच की नाही तो वठणीवर ?

महाराजांनी आरमार उभारण्याची नुकतीच सुरुवात केली होती. दर्यात गड वसवायला सुरुवात केली होती. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, रत्नागिरी, पद्मदुर्ग व कुलाबा हे जलदुर्ग बांधले होते. महाराजांनी आता निर्धार केला की इंग्रजांच्या सागरी सत्तेला बांध घालायचा !

सुमारे सहा वर्षांपूर्वी इंग्रजांना शह देण्यासाठी खांदेरी बेटावर जलदुर्ग बांधायचा प्रयत्न केला होता. पण इंग्रज व सिद्दी एक झाले. त्यांनी विरोध केला. महाराजांचे स्वप्न अपुरे राहिले.

पण आता महाराजांनी निर्धार केला, खांदेरी बेटावर जलदुर्ग बांधायचा. इंग्रज रोखायचा. अडवायचा. वेळ पडल्यास ठोकायचा !

खांदेरी बेट ही मोक्याची जागा होती. ते एक खडकाळ बेट होते. दीड मैल लांब आणि अर्धा मैल रुंद. मुंबईपासून केवळ अकरा मैलांच्या अंतरावर. मुंबई इंग्रजांच्या ताब्यात होती. खांदेरीवर महाराजांचा जलदुर्ग उभा राहिला की इंग्रजांचे नाक त्यांनी केव्हाही ठेचले असते.

पावसाळा नुकताच संपला होता. नारळी पौर्णिमा पार पडली होती. समुद्र शांत झाला होता.

महाराजांनी खांदेरी बेटावर जलदुर्ग बांधण्याचा बेत आखला. योजना तयार झाली. महाराजांनी आरमारी सरदार मायनाईक भंडारी याच्यावर कामगिरी सोपविली.



मायनाईक कामाला लागला. कुलाबा जिल्ह्यातल्या नागाव बंदरात तो दाखल झाला. नागावला माणसे जमली. साहित्य जमले. सगळी तयारी गुपचूप चालू होती. इंग्रज मोठा बिलंदर; पण त्याला ही खबर कळलीच नव्हती.

आणि एक दिवस मायनाईक गुपचूप खांदेरी बेटावर दाखल झाला. त्याने दीडशे माणसे आपल्याबरोबर आणली होती. चार तोफा आणल्या होत्या. बेटावर मराठ्यांची हालचाल सुरू झाली. मुंबईच्या इंग्रजांना ही बातमी समजली. ते बेचैन झाले; घाबरले.

इंग्रजांनी मायनाईकला कळवले—खांदेरी बेट आमचे आहे. तुम्ही येथून निघून जा.

काय गंमत आहे बघा. इंग्रज साडेपाच हजार मैलांवरून या देशात येतो आणि खांदेरी बेटावर आपला हक्क सांगतो ! वा रे न्याय ! पण त्या काळात आणि पूर्वीच्या काळात असेच चालू होते कोणीही यावे आणि राज्य स्थापावे ! पठाण आले, राजे झाले. तुर्क आले, राजे झाले. मोगल आले, राजे झाले ! पण आता असे चालणार नव्हते. शिवाजी महाराज असे चालू देणार नव्हते.

इंग्रजांना आपल्या आरमाराची मोठी घमेंड होती. त्यांना वाटले—दम दिला की मायनाईक निघून जाईल. पण तो होता मोठा वस्ताद. तो इंग्रजाला थोडाच भितो ? मायनाईकाने ठणकावून जबाब दिला—मी महाराजांच्या आज्ञेने हे बेट घेतले आहे. मी तुमचा हुकूम मानणार नाही. येथून जाणार नाही.

मायनाईक जबाब देऊन थांबला नाही. त्याने कामाला सुरुवात केली.

मायनाइकाची धिटाई पाहून इंग्रज वरमला. त्यांच्या आरमाराला तुच्छ लेखणारा त्याला यापूर्वी कोणी भेटला नव्हता. आता काय करावे ?

इंग्रजांनी मराठ्यांवर स्वारी करायचे ठरविले. ह्यूजेस याची रवानगी झाली. ह्यूजेस मराठ्यांवर चाल करून निघाला. त्याच्याबरोबर तीन शिबाडे होती. तोफा होत्या. भरपूर दारुगोळा होता.

मायनाइकाची चारशे माणसे खांदेरीची तटबंदी करीत होती. बेटाभोवती तीन फूट उंचीचा तट उभा राहिला होता मराठ्यांनी लढाईचीही तयारी केली होती. तोफांची तोंडे मुंबईकडे रोखून ते उभे होते.

ह्यूजेसची जहाजे खांदेरीच्या दिशेने हाकारली गेली. लाटांवर तरंगत जहाजे चालू लागली. इंग्रजांना वाटले—मायनाइकाने ह्यूजेसला समुद्रात बुडविले तर ! त्यांनी कॅप्टन मिंचीन याला ह्यूजेसच्या मदतीला पाठविले मिंचीनबरोबर दोन लढाऊ जहाजे होती. एकाचे नाव रिव्हेंज, दुसऱ्याचे हंटर. मिंचीनबरोबर थॉर्प हा इंग्रजांचा अधिकारी होता.

महाराजांचे दर्यायारंग मायनाईक आणि दौलतखान तयार होते. इंग्रजांनी खांदेरीवर तोफांचा भडिमार केला. मराठ्यांनी तोफांना तोफांनीच जबाब दिला. इंग्रजांनी खांदेरी बेट जिंकण्याचा बेत केला. तोफांची खडाजंगी उडाली. कानठळ्या बसू लागल्या. तोफांचे तांबडे भडक गोळे आकाशात उंच उडू लागले. पाण्यात पडू लागले. लाटा उसळू लागल्या. धूरच धूर पसरू लागला. इंग्रजांचा अधिकारी लेफ्टनंट थॉर्प मराठ्यांवर तुटून पडला.

मराठ्यांनी त्याला नेमका टिपला. थॉर्प ठार झाला. इंग्रज मागे हटला.

त्यानंतर एक महिना गेला.

आणि एक दिवस मराठ्यांची चाळीस गलबते बाहेर पडली. त्यांनी इंग्रजांच्या एकेका जहाजावर हल्ला केला. मराठ्यांचा मारा भयंकर होता. इंग्रजांची जहाजे पांगली. पळू लागली. जीव घेऊन पळू लागली. पण मराठ्यांनी रिव्हेंजला गाठले. तोफांचा भडिमार झाला. इंग्रज थांबले उलटले त्यांनी तोफेचे गोळे सोडले मराठे हट्टाला पेटले. भयंकर युद्ध झाले तीनशे मराठे ठार झाले. शंभर जखमी झाले.

पण मराठ्यांनी खांदेरीची तटबंदी चालूच ठेवली.

या युद्धात इंग्रजांनी जंग जंग पछाडले. त्यांनी मराठ्यांची रसद तोडण्याचा प्रयत्न केला. पाणी तोडण्याचा प्रयत्न केला. पण मराठे मोठे हिकमती. त्यांच्या छोट्या जहाजांची हालचाल अति चपळ. त्यांनी अनेक वेळा इंग्रजांची नजर चुकविली आणि भरपूर अन्नपाणी खांदेरीवर पोंचविले.

मग पोर्तुगीज इंग्रजांच्या मदतीला आला. त्याने इंग्रजांना अन्नधान्य पुरविले. त्याने ठाण्याकडून मराठ्यांची नाकेबंदी केली. सिद्दीही इंग्रजांच्या मदतीला आला. त्यानें जमिनीवरून मराठ्यांवर हल्ला. मराठ्यांची खेडी लुटली. काही गावे जाळली.

पण महाराजांनी इंग्रज, पोर्तुगीज आणि सिद्दी यांना जुमानले नाही त्यांनी खांदेरीच्या तटबंदीचे काम चालूच ठेविले.

आणि सिद्दीने एक डाव टाकला. खांदेरीच्या जवळच उंदेरी हे बेट होते. सिद्दीने उंदेरी बेट बळकावले. तीन हजार सैन्य घेऊन तो उंदेरीवर बसला.

सिद्दीच्या या कृत्याने मराठे संतापले. महाराजांचा दर्या-सारंग दौलतखान तीन हजार सैन्य घेऊन निघाला. त्याने उंदेरीला वेढा दिला. तीन बाजूंनी सिद्दीवर हल्ला केला. मराठ्यांच्या तोफा आग ओकू लागल्या. सिद्दीचे दोनशे लोक ठार झाले. शंभर घायाळ झाले. सिद्दी हैराण झाला. त्याने इंग्रजांचा धावा केला. त्याने इंग्रजांकडे मदत मागितली—तोफांची, दारूगोळ्याची आणि पैशाची !

पण इंग्रजांना शिवाजीशी युद्ध नको होते. शिवाजी मुंबईवर हल्ला करील अशी त्यांना भीती वाटली. त्यांनी महाराजांशी तहाचे बोलणे सुरू केले.

महाराजांचा प्रचंड जय झाला. जे कोणी केले नाही ते महाराजांनी केले. आरमारी युद्धात महाराजांनी इंग्रजांना नमवले, हरवले, पराभूत केले

खांदेरीवर आनंदाच्या लाटा उसळल्या !

IRBK-0115704

९५८०४ ९५।१।८५...
क्रो:वा ...